रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २३९ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## आक्षीमध्ये घरफोड्या वाढल्या

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील आक्षी गावात गेल्या काही दिवसांपासून घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: रात्रीच्या वेळी घडणाऱ्या या प्रकारांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.गेल्या दहा दिवसांत आक्षी परिसरात घरफोडीच्या घटनांची नोंद झाली आहे. काही दिवसांपूर्वी येथील एका घरात कोणीही नसल्याची संधी साधून चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास घरफोडी केली. सुदैवाने घरात मौल्यवान वस्तू नसल्याने चोरट्यांच्या हाती •> पान २ वर

## चार लाख ‘गुरुजी’ नापास

**मुंबई :** शिक्षकांची गुणवत्ता तपासण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या महा-टीईटी २०२५ परीक्षेचा निकाल धक्कादायक ठरला आहे. राज्यभरातून एकूण ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवारांनी परीक्षा दिली; मात्र त्यापैकी फक्त ५० हजार ३६९ उमेदवार पात्र ठरले. तब्बल सुमारे ४ लाख उमेदवार अनुत्तीर्ण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पेपर १ आणि पेपर २ या दोन्ही स्तरांवर उत्तीर्णतेचे प्रमाण केवळ सुमारे ११ टक्क्यांच्या आसपास राहिले. या निकालामुळे शिक्षकांच्या गुणवत्तेबाबत शैक्षणिक वर्तुळात चिंता व्यक्त होत आहे. उद्याची पिढी घडविणाऱ्या शिक्षकांच्या तयारीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी १७३ तर १५ पंचायत समित्यांमधील ११८ गणांसाठी ३२९ उमेदवार आहेत. मतदान केंद्रांवरील एका बॅलेट मशीनवर १२ उमेदवारांची नावे, चिन्ह असतील. त्यात पहिल्यांदा पांढऱ्या रंगातील नावे जिल्हा परिषदेच्या उमेदवारांची आणि त्याखाली गुलाबी रंगातील उमेदवार पंचायत समितीचे असणार आहेत. प्रत्येक मतदाराने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी प्रत्येकी एक अशी एकूण दोन मते द्यावी लागणार आहेत.**


## मतदारांनो, लक्ष द्या..!

### .. तर बाकीचे उमेदवार दुसऱ्या बॅलेटवर

एका बॅलेट मशीनवर १२ उमेदवारांची नावे, चिन्हे बसतात. जिल्हा परिषदेच्या एका गटात व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या गणातील उमेदवार १२ पेक्षा जास्त असतील, तर १२ च्या पुढील पंचायत समितीचे उमेदवार दुसऱ्या मशीनवर असतील. मतदारांनी आपल्या पसंतीच्या उमेदवाराचे नाव व चिन्ह शोधून दोन्ही उमेदवारास प्रत्येकी एक-एक मत टाकायचे आहे. उमेदवाराच्या नावापुढे चिन्ह आणि त्यापुढे बटण असणार आहे.

**मतदारास द्यावी लागणार दोन मते मशीनवर पांढऱ्या, गुलाबी रंगाची मतपत्रिका**



## एकाच ‘बॅलेट’वर असणार झेडपी, पंचायत समितीचेही उमेदवार

“ जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. एकाच बॅलेट मशिनवर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या उमेदवारांची नावे व चिन्हे असणार आहेत. प्रत्येक मतदाराला दोन मते (एक पंचायत समिती व एक जिल्हा परिषदेचा उमेदवार) द्यावी लागणार आहेत.
– विक्रम पाटील, तहसीलदार, अलिबाग

लोकसभा, विधानसभा निवडणुकीनंतर गावागावांतील मतदार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी मतदान करणार आहेत. प्रत्येक मतदारास दोन मते द्यावी लागतील. मतदारांचा संभ्रम दूर करण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी त्यांच्या यंत्रणेमार्फत बॅलेट मशीनसंदर्भातील •> पान २ वर

# मतदारांवर भाजपची सक्ती

- **समाजाच्या मंदिरात भाजप मागतंय वचन**
- **समाजाची सभा बोलावून मतदारांवर दबाव**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

लोकशाहीत मत देणं हा नागरिकाचा स्वातंत्र्याचा हक्क असताना, भाजपकडून मात्र उसरोली मतदारसंघात मतांसाठी दबावतंत्राचा उघडपणे वापर केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विविध समाजांच्या सभा बोलावून त्या मंचावरून कोणाच्या बाजूने मतदान करायचं याबाबत थेट आदेश दिले जात असून, मतदारांवर मानसिक दबाव टाकण्याचा गंभीर ग्रामस्थांनी उघडकीस आणला आहे. समाजाच्या नावाखाली राजकीय सौदेबाजी करून लोकांच्या म तस्वातंत्र्यावर गदा आणण्याचा हा प्रयत्न लोकशाही मूल्यांना तडा देणारा आहे. ॲड. महेश मोहितेंनी मतांसाठी केलेला मतदारांवर दबाव ही लाजिरवाणी बाब असून, त्यांच्याविरोधात उसरोली




### आचारसंहितेचा भंग

निवडणूक आचारसंहिता लागू असताना घडणाऱ्या या प्रकारांमुळे निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. समाजाच्या नावाखाली मतदारांवर दबाव टाकणं, वचनबद्धतेची मागणी करणं आणि मतदानाच्या स्वातंत्र्यावर गदा आणणं हे स्पष्टपणे आचारसंहितेचे उल्लंघन ठरत असताना, जिल्हा निवडणूक प्रशासन आणि निवडणूक आयोग याबाबत काय भूमिका घेणार, हा थेट सवाल उपस्थित झाला आहे. तक्रारीनंतरही जर कारवाई होत नसेल, तर सत्ताधाऱ्यांसाठी एक नियम आणि सर्वसामान्यांसाठी दुसरा नियम, अशी लोकशाही आहे का, असा संतप्त प्रश्न आता उसरोली मतदारसंघातील मतदार विचारत आहेत.

मतदारसंघातील मतदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. याबाबत अपक्ष उमेदवार अंकिता पोवळे यांनी जिल्हा निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असून, आता निवडणूक विभाग काय कारवाई करणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

उसरोली जिल्हा परिषद मतदारसंघातील बोर्ली मांडला गावात पंचकुम समाज मोठ्या प्रमाणात आहे. या मतदारसंघात महाविकास आघाडीकडून राजश्री मिसाळ, शिंदे गटाच्या ज्योती नागवेकर व भाजपकडून मनस्वी मोहिते रिंगणात आहेत. सध्या राजश्री मिसाळ यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्यांचा विजय निश्चित •> पान २ वर


“ महेश मोहिते यांचे भाऊ पप्पू मोहिते यांनी बापूजी मंदिरात पंचकुम समाजबांधवांची बैठक लावून त्यांना कमळ आणि घड्याळाला मतदान करण्याची शपथ घालताय. आमच्या बांधवांवर मतदान करण्यासाठी हा दबाव नाही का? आम्हाला मतदान केले तर मंदिरासाठी निधी आणून मंदिर बांधून देऊ, असे आमिष निवडणुकीच्या काळात देता. ही बाब लोकशाहीला बांधा आणणारी असून, यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग झाला आहे. याबाबत मी जिल्हाधिकारी, धर्मादाय आयुक्त, तहसीलदार, निवडणूक भरारी पथकाचे अधिकारी यांना निवेदन दिले आहे. ज्यांच्या सांगण्यावरुन ही बैठक घेण्यात आली, ते समाजाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.
– अंकिता पोवळे, अपक्ष उमेदवार ”

## प्रचारतोफा थंडावल्या

### आता मतदारांच्या कौलाकडे लक्ष

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या पंधरा दिवसांपासून रंगलेली प्रचाराची रणधुमाळी गुरुवारी रात्री दहा वाजता अधिकृतपणे थांबली. सभा, बैठका, पदयात्रा, घरभेटी आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि उमेदवार यांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. प्रचार थांबताच आता सर्वांचे लक्ष शनिवारी, दि. ७ रोजी होणाऱ्या मतदानाकडे लागले आहे. मतमोजणी सोमवारी, दि. ९ रोजी सकाळी दहा वाजल्यापासून होणार आहे.



जिल्हा परिषदेच्या ५९ गटांमध्ये आणि पंचायत समितीच्या ११८ गणांमध्ये उमेदवारीचे चित्र २७ जानेवारीला स्पष्ट झाले होते. या निवडणुकीत एकूण ५०२ उमेदवार रिंगणात असून, त्यात जिल्हा परिषदेचे १७३ तर पंचायत समितीचे ३२९ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. अनेक ठिकाणी चुरशीच्या लढती रंगल्या असून, काही गट आणि गणांमध्ये बहुकोनी लढतीमुळे निकालाबाबत उत्सुकता वाढली आहे.

गेल्या दोन आठवड्यांमध्ये विविध राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनी सभा-बैठका, प्रचारफेऱ्या, कोपरा सभा, पदयात्रा आणि प्रत्यक्ष भेटीगाठींच्या माध्यमातून मतदारांशी संपर्क साधला. गावागावांत राजकीय चर्चांना उधाण आले होते. स्थानिक प्रश्न, विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार अशा मुद्द्यांवर उमेदवारांनी आपापली भूमिका मांडत मतदारांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला.

प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात आरोप-प्रत्यारोप, पत्रके, सोशल मीडियावरील प्रचार आणि घरपोच संपर्क मोहिमा यांना वेग आला होता. रात्री उशिरापर्यंत प्रचार सुरू असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. मात्र, आचारसंहितेनुसार गुरुवारी रात्री दहा वाजताच प्रचार थांबल्याने राजकीय हालचालींना अचानक विराम मिळाला. प्रचार थांबल्यानंतर निवडणूक यंत्रणा अधिक सतर्क झाली असून, मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी •> पान २ वर

## वेधक

### कोळसा खाणीत स्फोट, दहा मजूर ठार

**नवी दिल्ली :** मेघालयातील कोळसा खाणीत झालेल्या भीषण स्फोटात दहा मजुरांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनास्थळी पोलीस आणि प्रशासन पोहोचलं आहे. त्यांनी बचाव कार्य सुरु केलं आहे. मेघालयाच्या ताशखाई परिसरात असलेल्या एका कोळसा खाणीत हा स्फोट झाला. या घटनेनं संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तातडीनं मदत आणि बचाव कार्य सुरु केलं. खाणीत काम करणाऱ्या मजुरांना त्यांचा जीव वाचवण्याची संधीच मिळाली नाही. त्यामुळे त्यांचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाला.

### तापमानात चढ-उतार

**मुंबई :** भारतीय हवामान विभागाने उत्तर भारतात पुढील ४८ तासांत पाऊस, बर्फवृष्टी आणि जोरदार वाऱ्याचा इशारा दिला असला तरी महाराष्ट्रात पावसाचा धोका नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, तापमानातील बदलामुळे राज्यात हवामानाचा वेगळा परिणाम जाणवणार आहे. राज्यात काही भागांत थंडीचा जोर कायम राहणार असताना मुंबई, कोकण आणि मराठवाडा भागात तापमान १ ते २ अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे किनारी भागात उकाडा वाढेल आणि उन्हाचा चटका जाणवू शकतो. विदर्भात हवामान कोरडे राहणार आहे.

### माओवाद्याचा खात्मा

**मुंबई :** गडचिरोलीत पोलीस आणि माओवादी यांच्यात चकमक सुरु आहे. या चकमकीत एक माओवादी ठार झाला आहे. तर, गडचिरोली पोलिसांचा एक जवानही गंभीर जखमी झाला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अबुझमाड जंगलात फोदेवाडा गावापासून तीन किलोमीटर पुढे छत्तीसगड सीमेजवळ बुधवारपासून गडचिरोली पोलीस आणि माओवाद्यांमध्ये जोरदार चकमक सुरू आहे. बुधवारी सकाळी साडेदहा वाजता सुरु झालेली चकमक अजूनही पूर्णपणे संपलेली नाही. दरम्यान, गुरवारी दिवसा पोलिसांनी त्या भागात राबवलेल्या सर्च ऑपरेशनमध्ये एका माओवाद्याचा मृतदेह आढळून आला आहे.

### सोन्या-चांदीचे दर घसरले

**मुंबई :** जागतिक बाजारपेठेतील घडामोडींचा मोठा परिणाम गुरुवारी सराफा बाजारावर दिसून आला. बुधवारी ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचलेले सोने आणि चांदीचे भाव गुरुवारी अनपेक्षितपणे कोसळले. एकाच दिवसात सोन्याच्या दरात ७ हजार रुपयांची, तर चांदीत तब्बल ३२ हजार रुपयांची मोठी घसरण झाल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. गुरुवारी २४ कॅरेट सोन्याचे भाव ३ टक्के जीएसटीसह १,५८,१०० रुपये आणि प्रति किलो चांदी २,६३,१६० रुपयांपर्यंत कमी झाली. या घसरणीमुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

## ३२ तासांनंतर कोंडी फुटली!



- **अथक प्रयत्नांनंतर प्रोपिलीन गॅस टँकर हटवला**
- **एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक सुरळीत**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर खंडाळा घाटातील आडोशी बोगद्याजवळ पलटी झालेला अत्यंत ज्वलनशील प्रोपिलीन गॅस टँकर अखेर ३२ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर हटवण्यात आला. त्यामुळे पुणे-मुंबई आणि मुंबई-पुणे या दोन्ही मार्गांवरील वाहतूक पुन्हा पूर्णपणे सुरळीत सुरू झाली आहे.

मंगळवारी (दि. ३) सायंकाळी सुमारे ५ वाजता पुण्याहून मुंबईकडे जाणारा गॅस टँकर चालकाचे नियंत्रण सुटल्याने पलटी झाला. टँकरमधून गॅसची •> पान २ वर

## भराडीदेवीच्या यात्रेसाठी विशेष ट्रेन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आंगणेवाडी यात्रेनिमित्त कोकण रेल्वे प्रशासनाने ७ ते ९ फेब्रुवारीदरम्यान विशेष ट्रेन सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे देवी भराडीच्या दर्शनासाठी येणाऱ्या चाकरमान्यांची सोय होणार आहे. आंगणेवाडी येथील भराडी देवी यात्रेसाठी होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता, कोकण रेल्वेने मडगाव जंक्शन ते लोकमान्य टिळक टर्मिनसदरम्यान विशेष साप्ताहिक ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही गाडी क्र. ०१००४ मडगाव जंक्शन ते लोकमान्य टिळकदरम्यान ७ व ९ फेब्रुवारी रोजी धावणार आहे. ही गाडी मडगाव येथून दुपारी १६.३० वा. सुटेल आणि दुसऱ्या •> पान २ वर

## खोट्या पंचनाम्याने जमीन वर्ग बदलला

### कोटिंबेतील शेतकऱ्याचा आरोप; संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी तहसीलदारांकडे धाव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कोटिंबे गावात जमीन वर्ग-२ वरून वर्ग-१ करण्याच्या प्रक्रियेदरम्यान पंचनामा चुकीच्या पद्धतीने केल्याचा गंभीर आरोप शेतकरी कृष्णा श्रीराम जाधव यांनी केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.

मौजे कोटिंबे येथील सर्वे क्रमांक १०१/८ व १०२ या जमिनीबाबत २२ डिसेंबर २०२५ रोजी काळूराम वाळकू सोनावणे यांनी वर्ग-२ जमीन वर्ग-१ करण्यासाठी तहसीलदार कार्यालयात अर्ज केला होता. या अर्जावरून तहसीलदारांनी मंडळ अधिकारी कशेळे यांना पडताळणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. मंडळ अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केल्यानंतर तहसीलदारांकडून वर्ग-२ चे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याचे आदेशपत्र जारी करण्यात आले. यानंतर १६ जानेवारी २०२६ रोजी तलाठी, कोटिंबे यांनी संबंधित नोंद केली. मात्र, हा अहवाल चुकीच्या माहितीवर आधारित असल्याचा दावा करत कृष्णा जाधव यांनी १९ जानेवारी रोजी हरकत नोंदवली. तरीदेखील, मंडळ अधिकारी कशेळे यांनी २५ जानेवारी २०२६ रोजी, म्हणजेच सुट्टीच्या दिवशी (रविवारी) ही नोंद मंजूर केल्याचा आरोप आहे.

### खोटा पंचनामा करून फसवणूक

**मंडळ अधिकारी बाबासाहेब शेटे यांनी ग्रामस्थांचे खोटे जबाब नोंदवून चुकीचा पंचनामा तयार केल्याचा आरोप करत, त्यांच्याविरोधात कायदेशीर चौकशी करून गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शेतकरी कृष्णा जाधव यांनी केली आहे. तसेच तलाठी व संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.**

पंचनामा करताना ग्रामस्थ म्हणून ज्यांची नावे दाखवली गेली, ते पंच गावाबाहेरील असून, त्यांचा संबंधित जमिनीशी काहीही संबंध नाही. तसेच पंचनाम्यावेळी पोलीस पाटील, कोतवाल किंवा शेजारील शेतकऱ्यांची विचारणा करण्यात आली नाही, असा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. सातबारा उताऱ्यावर नोंद असलेल्या व्यक्तींची संमती न घेता पंचनामा केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

यासंदर्भात राम संभाजी सोनवणे यांनीही हरकत घेतली होती. मात्र, तीही सुट्टीच्या दिवशी मंजूर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तहसीलदार कार्यालयात भेट दिल्यानंतर अशा प्रकारचे अनेक चुकीचे पंचनामे आढळल्याचा दावा संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे.

**गटविकास अधिकारी शर्मिला पिंगळेंच्या जिद्दीला सलाम | प्रशासनातील अधिकाऱ्यांसमोर कामातून नवा आदर्श**

## लोकशाहीच्या रक्षणासाठी व्हीलचेअरवरुन पहारेदारी

**। चौल । प्रतिनिधी ।**

निवडणूक म्हणजे लोकशाहीची खरी परीक्षा. या परीक्षेत नियमांची कडक अमंलबजावणी व्हावी म्हणून प्रशासनातील काही अधिकारी एसी केबिनमध्ये बसून फक्त आदेश सोडत बसतात, तर काही जण स्वतः मैदानात उतरतात. लोकशाहीच्या रक्षणासाठी जिद्दीने स्वतःच्या अपंगत्वावर मात करुन अलिबाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शर्मिला पिंगळे प्रत्यक्ष फिल्डरवर उतरुन आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंबलबजावणी करत आहेत. जबाबदारी ही पदाची नसून कृतीतून सिद्ध करायची असते, याचा प्रेरणादायी आदर्श त्यांनी घालून दिला आहे.



### ‘कर्तव्य प्रथम’चा संदेश

व्हीलचेअरवर असूनही स्वतः फिल्डवर उपस्थिती, वाहन तपासणी व पथक भेटींमध्ये सक्रिय सहभाग आणि आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जिद्द शर्मिला पिंगळे यांनी कृतीतून दाखवून दिली आहे. पदापेक्षा कर्तव्य मोठे, हेसुद्धा त्यांनी दाखवून दिले आहे.

७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लागू असलेल्या आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी पथक प्रमुख म्हणून नेमणूक झालेल्या शर्मिला पिंगळे सध्या अक्षरशः फिल्डवर उतरल्या आहेत. व्हीलचेअरवर असूनही त्या स्वतः वाहन तपासणी, पथक भेटी आणि प्रत्यक्ष तपासणी प्रक्रियेत सहभागी होत आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण पथक अधिक सजग, जबाबदार आणि सक्रिय झालेले दिसते. अधिकारी म्हणून केवळ आदेश देणे नव्हे, तर स्वतः उपस्थित राहून काम पाहणे, ही त्यांची कार्यशैली ठळकपणे जाणवते. •> पान २ वर

“ लोकशाहीचे रक्षण करणे हे माझे मी कर्तव्य समजते. शासकीय अधिकारी असल्याने ते माझे कामच आहे. परंतु, प्रत्येक नागरिकानेही यासाठी पुढाकार घ्यावा, असे मला वाटते. निवडणूक ही लोकशाहीचा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. माझी शारीरिक परिस्थिती ही कामात अडथळा नसून, जबाबदारी अधिक चोख पार पाडण्याची प्रेरणा आहे.
– शर्मिला पिंगळे, गटविकास अधिकारी, अलिबाग ”

## राज्यसभेत प्रचंड गदारोळ

### घोषणाबाजीतच पंतप्रधानांचे भाषण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

संसदेच्या दोन्ही सभागृहांत वाढलेल्या तणावाचे तीव्र पडसाद गुरुवारी राज्यसभेत उमटले. विरोधकांनी ‘लोकशाही वाचवा’ आणि ‘तानाशाही नाही चलेगी’ अशा घोषणांनी सभागृह दणाणून सोडले, तर त्या गदारोळातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले भाषण सुरू ठेवले.

लोकसभेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांना लष्करप्रमुख एम.एम. नरवणे यांच्याशी संबंधित मुद्द्यांवर बोलण्याची संधी न मिळाल्याने विरोधक आधीच आक्रमक होते. त्याचेच प्रतिबिंब राज्यसभेत दिसून आले. पंतप्रधान भाषणासाठी उभे राहताच विरोधी पक्षांचे खासदार वेलमध्ये उतरले आणि जोरदार घोषणाबाजी सुरू केली.

सभागृहात मोठा गोंधळ सुरू असतानाही पंतप्रधानांनी भाषण थांबवले नाही. त्यांनी सरकारच्या योजनांबाबत मांडणी सुरू ठेवली. दरम्यान, विरोधकांकडून महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा घेण्याची मागणी होत असताना कामकाज सुरूच ठेवण्यात आल्याने वातावरण अधिकच तापले. सभागृहाबाहेर प्रसारमाध्यमांशी बोलताना विरोधी नेत्यांनी सरकारवर टीका केली.

देश सुरक्षेसारख्या गंभीर विषयांवर उत्तरं देण्याऐवजी सरकार टाळाटाळ करत असल्याचा आरोप त्यांनी केला. संसदेत विरोधकांचा आवाज दाबला जात असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी लोकशाही मूल्यांबाबत प्रश्न उपस्थित केले.

# पाली डम्पिंग ग्राऊंडची दुरवस्था

## प्रदूषणामुळे नागरिक व गुरांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पाली येथील टेंबी व शिक्षक वसाहतीजवळ असलेल्या डम्पिंग ग्राऊंडची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, तेथून होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिक आणि गुरांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट न लावता तो उघड्यावर टाकणे आणि जाळणे यामुळे वायूप्रदूषण, दुर्गंधी आणि रोगराईचा धोका वाढल्याची तक्रार स्थानिकांकडून होत आहे.

संरक्षक भिंत नसल्याने डम्पिंग ग्राऊंडमधील कचरा अस्ताव्यस्त पसरला असून, काही ठिकाणी तो रस्त्यावरही येत आहे. ओला व सुका कचरा वेगळा न करता एकत्रितपणे येथे टाकला जातो. त्यानंतर कचरा जाळण्याची पद्धत वापरली जाते. सुका कचरा अनेक दिवस जळत राहिल्याने विषारी धूर पसरतो, तर ओला कचरा सडत राहिल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी निर्माण होते. पावसाळ्यात या कचऱ्यातून झिरपणारे दूषित पाणी मानवी वस्तीत शिरत असल्याचीही तक्रार आहे. या ठिकाणाजवळ शिक्षक वसाहत, इतर निवासी वसाहती तसेच मढाळी व शिळोशी गावांकडे जाणारा मार्ग असल्याने रहिवासी, पादचारी आणि वाहनचालकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



**जनावरांचे आरोग्यही धोक्यात**

डम्पिंग ग्राऊंडमध्ये गाय, बैल, म्हशी, कुत्रे, कावळे असे पशुपक्षी अन्नाच्या शोधात फिरताना दिसतात. प्लास्टिक पिशव्यांमध्ये टाकलेले अन्न ते पिशवीसकट खात असल्याने त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. प्लास्टिक खाल्ल्यामुळे अनेक गुरांचा मृत्यू झाल्याची नोंद असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

> "डम्पिंग ग्राऊंड अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. कंपोस्ट पिट्स आणि एमआरएफ शेडचे काम प्रगतीपथावर आहे. कंपोस्ट खड्डे पूर्ण झाल्यावर ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मिती सुरू होईल. एमआरएफ शेडमध्ये सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करून प्लास्टिक बेलिंग मशीनद्वारे प्लास्टिकचे गठ्ठे तयार केले जातील. सुरक्षा भिंतीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. – माधुरी मडके, मुख्याधिकारी, पाली"

> "डम्पिंग ग्राऊंडमधील प्रदूषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि नगरपंचायत दोघांचेही दुर्लक्ष आहे. कचरा विल्हेवाटीची यंत्रणा धूळ खात ठेवून कचरा जाळला जातो. एकीकडे क्रीडा मैदानासाठी कोट्यवधींचा निधी, तर दुसरीकडे नागरिक व गुरांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. –कपिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पाली"

## पनवेलमध्ये उमेदवारांचा प्रचाराचा झंझावात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वावंजे जिल्हा परिषद मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेद्वार लता डी.बी. म्हात्रे, पंचायत समितीचे उमेदवार पराग भोपी, बाळू वारा तसेच आदई पंचायत समितीचे उमेदवार विलास फडके यांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी शिवसेनेचे ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका प्रमुख विश्वास पेटकर, विभागप्रमुख प्रमोद पाटील, युवासेना विधानसभा चिटणीस जीवन पाटील, उपमहानगर प्रमुख रामदास गोंधळी, देवीचापाडा उपशाखाप्रमुख नंदू म्हात्रे, वावंजे शाखा प्रमुख परशुराम गायकर, उपतालुका प्रमुख बबन फडके आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# चिरनेरमध्ये प्रचार अंतिम टप्प्यात

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर जिल्हा परिषद गट व चिरनेर पंचायत गणातील महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. अविनाश विजय ठाकूर व महाविकास आघाडीच्या उमेदवार कविता रुपेश पाटील यांच्या प्रचाराचा वेग आता वाढत आहे. चिरनेर जिल्हा परिषद मतदार संघात प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. उमेदवार ॲड. अविनाश विजय ठाकूर हे केवळ उमेदवार नाहीत, तर जनतेतून घडलेले एक नेतृत्व आहे. सुशिक्षित व जागरूक, समाजाच्या प्रश्नांची त्यांना जाण असल्यामुळे सामाजिक व राजकीय वारसा त्यांना लाभला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप, शिवसेना महाविकास आघाडीच्या माध्यमातून ते चिरनेर जिल्हा परिषदेच्या मतदारसंघातून विकासासाठी रणांगणात उतरले आहेत. तर मतदार संघाच्या विकासासाठी जे जे शक्य असेल, ते मी करणार असल्याचेदेखील त्यांनी सांगितले. विकासाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीदेखील मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रचाराची धुरा सांभाळण्यासाठी महाविकास आघाडीचे दिग्गज नेते माजी आ. मनोहर भोईर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्यासह अनेक छोटे-मोठे कार्यकर्ते मैदानात उतरले आहेत. सामान्य जनतेचा बुलंद आवाज म्हणून उमेदवार ॲड. अविनाश ठाकूर व कविता पाटील यांच्या रूपाने उमेदवार लाभले आहेत. कार्यकर्ते कानाकोपरा पिंजून काढून महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांच्या विजयासाठी झटत आहेत.



# निवडणुकीच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर निवडणूक तयारीला वेग आला आहे. पनवेल येथील वि. खे. हायस्कूलमध्ये निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक साहित्य, यंत्रणा व व्यवस्थांची तयारी सुरू करण्यात आली आहे. या तयारीची जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला.

यावेळी प्रांताधिकारी व तहसीलदारयांनीमतदानप्रक्रियेसाठी लागणारे साहित्य, कर्मचाऱ्यांची नियोजनबद्ध नियुक्ती, तसेच केंद्रावरील सुविधा यांची माहिती दिली. निवडणूक कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, प्रशासनाकडून सर्व तयारी अंतिम टप्प्यात आणण्यात येत आहे.

## मविआच्या उमेदवारांना वाढता पाठिंबा

**। उरण । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीचे नवघर जिल्हा परिषद गटातून उभे असलेल्या प्रेरणा पाटील, भेंडखळ पंचायत समिती गणातून उभे असलेले उमेदवार दीपक भोईर व नवघर पंचायत समिती गणातून उभे असलेले उमेदवार परेश ठाकूर हे मशाल या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. हे तिन्ही उमेदवार आपापल्या परिसरात व विभागात जोरदार प्रचार करत असून, प्रत्येक घराघरात जाऊन नागरीकांशी उत्तम संवाद साधत आहेत. प्रचारादरम्यान त्यांना जनतेचाही उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

# कर्जत तालुक्यात २२० केंद्रांवर मतदान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद व कर्जत पंचायत समिती निवडणुकीसाठी कर्जत तालुक्यातील निवडणूक यंत्रणेची तयारी पूर्ण झाली आहे. तालुक्यातील २२० मतदान केंद्रांवर ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, सुमारे १ लाख ७० हजार मतदार आपला हक्क बजावणार आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणाही सज्ज झाली आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ६ गटांसाठी (कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव, मोठे वेणगाव) आणि कर्जत पंचायत समितीच्या १२ गणांसाठी (पोशीर, कळंब, पाथरज, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, उकरूल, नेरळ, दामत, वाकस, कडाव, मोठे वेणगाव, बीड बुद्रुक) मतदान होणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी दिली.





गटनिहाय मतदान केंद्रांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. कळंब (३६), कशेळे (३७), माणगाव तर्फे वरेडी (३८), नेरळ (४०), कडाव (३४) आणि मोठे वेणगाव (३५). दुर्गम भागातील पेठ व तुंगी ही दोन केंद्रे असून, तेथे मतदान साहित्य व कर्मचारी थार वाहनातून पाठवले जाणार आहेत. तसेच ढाक व कळकराई येथील दोन दुर्गम केंद्रे स्थलांतरित करण्यात आली आहेत. तालुक्यात एकही संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील केंद्र नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

**१.७० लाख मतदार सज्ज**

सर्व २२० केंद्रांसाठी सुमारे १४०० अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात येणार असून, प्रत्येक केंद्रावर एक केंद्राध्यक्ष, तीन सहायक, एक शिपाई व एक सुरक्षा कर्मचारी असणार आहे. कर्जत, नेरळ व इतर पोलीस ठाण्यांतील अधिकारी-कर्मचारी, १२ पोलीस अधिकारी आणि सुमारे ५०० होमगार्ड यांच्या मदतीने कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

पान १ वरून

## मतदारांनो, लक्ष द्या..!

माहिती मतदारांपर्यंत पोहोचवीत आहेत. तहसीलदारांनी मतदान कसे करायचे, एकाच मशीनवरील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे उमेदवार कसे ओळखावे, याचे मार्गदर्शन केले आहे. बॅलेटवर जिल्हा परिषद गटाची मतपत्रिका पांढऱ्या रंगात असेल, त्यावर मतदाराच्या जिल्हा परिषद गटातील उमेदवारांची नावे, चिन्हे असतील. दुसरीकडे त्याच मशीनवर पंचायत समितीची मतपत्रिका गुलाबी रंगाची आहे. त्यावर मतदाराच्या पंचायत समिती गणातील उमेदवारांची नावे व चिन्हे असतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## आक्षीमध्ये घरफोड्या

काहीच लागले नाही. मात्र, या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीती पसरली. यानंतर त्याच परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास आणखी एका घरात घरफोडीचा प्रयत्न झाला. मात्र, घरातील सदस्यांनी प्रसंगावधान राखत आरडाओरडा केल्याने चोरट्यांनी तेथून पळ काढला. यापूर्वीही आक्षी परिसरात मोठी घरफोडी झाल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत.

घरफोडीच्या वाढत्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, आक्षी ग्रामपंचायतीच्या वतीने अलिबाग पोलिसांकडे गावात नियमित गस्त घालण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार, गेल्या दोन दिवसांपासून पोलिसांकडून रात्रीच्या वेळी गस्त वाढवण्यात आली आहे. नागरिकांनीही सतर्क राहून संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## ३२ तासांनंतर कोंडी फुटली!

गळती सुरू झाल्याने मोठ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला होता. खबरदारी म्हणून प्रशासनाने तात्काळ मुंबईकडे जाणारी वाहतूक थांबवली आणि काही काळ दोन्ही बाजूंची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली.

या निर्णयामुळे महामार्गावर २० ते २५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. हजारो प्रवासी, ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि रुग्ण वाहनांत अडकून पडले. अन्न, पाणी व स्वच्छतागृहाच्या सुविधांचा अभाव असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. टँकरमध्ये गॅस शिल्लक असण्याची शक्यता लक्षात घेऊन बचावकार्य अत्यंत सावधगिरीने राबवण्यात आले. फायर ब्रिगेडकडून सतत पाण्याचा मारा करण्यात येत होता.

या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये पोलीस, एनडीआरएफ, फायर ब्रिगेड, ओएनजीसीचे तज्ज्ञ, सीआयएसएफ जवान आणि स्थानिक स्वयंसेवक यांनी समन्वयाने काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, वाहतूक कोंडीत अडकलेल्या प्रवाशांनी टोलवसुली सुरू असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. अखेर ३२ तासांच्या प्रयत्नांनंतर टँकर हटवण्यात यश आले असून, महामार्गावरील वाहतूक सुरळीत झाली आहे.

## भराडीदेवीच्या यात्रेसाठी विशेष ट्रेन

दिवशी पहाटे ०५.५० वा. मुंबईला पोहोचेल. गाडी क्र. ०१००३ लोकमान्य टिळक टर्मिनस-मडगाव जंक्शन ही गाडी ८ फेब्रुवारी आणि १० फेब्रुवारी रोजी धावणार आहे. ही गाडी मुंबई येथून स.०७.५५ वा. सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १० वा. मडगावला पोहोचेल. या गाड्यांना एकूण २२ डबे असून, त्यातील २० स्लीपर कोच आणि २ एसएलआर आहेत.

## लोकशाहीच्या रक्षणासाठी व्हीलचेअरवरुन पहारेदारी

निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि भयमुक्त ठेवण्यासाठी त्या घेत असलेली मेहनत ही प्रशासकीय कर्तव्यनिष्ठेचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. शारीरिक अडचणी असूनही जबाबदारीपासून दूर न जाता त्यांनी दाखवलेली जिद्द अनेकांसाठी शिकण्यासारखी आहे. लोकशाहीचे खरे बळ हे अशाच प्रामाणिक आणि कार्यतत्पर अधिकाऱ्यांमुळे टिकून आहे, हे या प्रसंगातून स्पष्ट होते.

## मतदारांवर भाजपची सक्ती

असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सैरभैर झालेल्या ॲड. महेश मोहितेंनी पत्नी मनस्वी मोहिते हिला मतं मिळविण्यासाठी आता गैरमार्गाचा वापर केल्याचे समोर आले आहे. अपक्ष उमेदवार अंकिता पोवळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ फेब्रुवारी रोजी बोर्ली मांडला गावात पंचकुम समाज मंदिरात समाजाची सभा बोलवण्यात आली होती. त्या सभेत उघडपणे स्वयंघोषित अध्यक्ष प्रकाश शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अनधिकृतपणे भाजपच्या जिल्हा परिषद उमेदवार ॲड. मनस्वी मोहिते व राष्ट्रवादीचे पंचायत समितीचे उमेदवार संजय महाडिक यांनाच मतदान करण्याची ताकीद ग्रामस्थांना दिली. तसेच विरोधात मतदान केल्यास समाजाच्यावतीने कारवाई करण्याचे संकेत दिले. याबाबतचे सर्व पुरावे अंकिता पोवळे यांच्याकडे असून, त्यांनी याबाबत निवडणूक विभागाकडे तक्रार केली आहे.

## प्रचारतोफा थंडावल्या

प्रशासनाकडून आवश्यक ती तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मतदान केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ, मतदान साहित्य, बॅलेट मशिन्स आणि सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. संवेदनशील केंद्रांवर विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला असून, अधिकाऱ्यांकडून सतत पाहणी केली जात आहे.

मतदारांनी कोणताही संभ्रम न बाळगता शांततेत मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मतदानाच्या दिवशी सकाळपासूनच मतदारांची गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागात या निवडणुकीला मोठे महत्त्व असल्याने मतदारांचा उत्साहही वाढलेला दिसून येत आहे. आता सर्वांचे लक्ष मतदारांच्या कौलाकडे लागले असून, कोणत्या पक्षाला आणि कोणत्या उमेदवारांना मतदार पसंती देतात, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. गेल्या पंधरा दिवसांचा प्रचार, उमेदवारांची प्रतिमा, स्थानिक प्रश्न आणि मतदारांशी साधलेला संपर्क याचा निकालावर किती परिणाम होतो, हे सोमवारी होणाऱ्या मतमोजणीत स्पष्ट होणार आहे.





# हरित ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीसाठी महावितरणला राष्ट्रीय गौरव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

हरित ऊर्जेला प्राधान्य देत शाश्वत व स्वस्त वीजपुरवठ्याकडे वाटचाल करणाऱ्या महावितरणला १४ व्या हरित ऊर्जा शिखर परिषदेत हरित ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमता उत्कृष्टता पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथे इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित परिषदेत केंद्रीय ऊर्जा सचिव (सेवानिवृत्त) अनिल राजदान यांच्या हस्ते हा पुरस्कार महावितरणच्या अधिकाऱ्यांनी स्वीकारला.

महावितरणने दीर्घकालीन वीज खरेदी करारांमध्ये तब्बल ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केला असून आतापर्यंत ७२,९१८ मेगावॅट क्षमतेचे पीपीए केले आहेत. त्यापैकी ४७,३४७ मेगावॅट हरित ऊर्जेचे आहेत. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्यासाठी ३,५२० मेगावॅट सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून, सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होत आहे. राज्यात ८ लाखांहून अधिक सौर कृषीपंप सुरू आहेत. तसेच 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेत ४.४३ लाख घरांवर १,७३३ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर प्रकल्प उभारले गेले आहेत, ज्यामुळे अनेकांचे वीजबिल शून्य झाले आहे. राज्याच्या ऊर्जा परिवर्तन आराखड्यानुसार २०३० पर्यंत हरित ऊर्जेचा वाटा ५२ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असून, या क्षेत्रात मोठ्या गुंतवणुकीसह रोजगारनिर्मितीही अपेक्षित आहे.

**जाहीर नोटीस**

माझे आशिल यांनी दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १०४, हिस्सा नं. २ अ/२ क्षेत्र ०.०५.०० (हे.आर), आकार. रू. ५०.०० पैसे या बिनशेती मिळकतीवरील रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील बांधण्यात आलेल्या "वक्रतुंड रेसिडेन्सी हौ. कॉ. सोसायटी." या इमारतीतील बी विंग पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०४, क्षेत्र ४३९.३१ चौ. फुट बिल्टअप, (४०.८२ चौ. मीटर) (रेवदंडा ग्रामपंचायत घर क. ३३८२/१२) ही मिळकत आज सौ. सुमन शरद खैरे, रा. निल दर्शन रूम नं. २ प्लॉट नं. ९० एमसीसीएच सोसायटी पनवेल ता. पनवेल जि. रायगड. यांच्या नावे असेसमेंट रेकॉर्डला नोंदलेली आहे. सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस सदर मिळकत विकत देण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझ्या आशिलांस दिला आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, भाडेकरार, ताबेकब्जा वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- ०५/०२/२०२६.

(ॲड. प्रतिमा पी. खोत)
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस. टी. स्टॅण्डजवळ, अलिबाग,ता. अलिबाग, जि. रायगड,
९९२१२५४६३०

# विद्यार्थ्यांसाठी विधी साक्षरता कार्यक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र द. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली को.ए.सो.सी.एच. केळुस्कर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी (दि.२) करण्यात आले होते.





या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या ॲड. मनीषा नागावकर यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत मार्गदर्शन केले. त्यासोबतच मोटार अपघात कायदा व त्याअंतर्गत मिळणाऱ्या कायदेशीर हक्कांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. त्यानंतर ॲड. उषा पाटील यांनी नालसाच्या डी.ओ.एन. व जागृती योजनेबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबागच्या सचिव तेजस्विनी निराळे, जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षा तथा नगरसेविका साक्षी पाटील या उपस्थित होत्या. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. या कार्यक्रमामुळे उपस्थित विद्यार्थ्यांना विविध कायदे, योजना व कायदेशीर हक्क यांची उपयुक्त माहिती मिळाली असून, विधी साक्षरतेस चालना मिळाली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड. निलोफर शेख यांनी केले.

**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल. | ०३ बदाम, ०१ उंबर, ०२ बदाम, ०१ नारळ, ०२ उंबर, ०१ आंबा, ०१ पेरू, ०१ गुलमोहर, ०१ जांभुळ, ०१ सूपारी, ०२ बदाम, ०४ शेवगा, ०१ नारळ, ०१ आंबा व ०१ कडुलिंब अशी एकूण २३ झाडे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील १) कळंबोली, सेक्टर १२ भू. क्रः B/५ येथील ०३ बदाम व ०१ उंबर एकूण ०४ झाडे तोडणी व २) कळंबोली, सेक्टर- ५ E भू. क्रः ५/A येथील ०२ बदाम, ०१ नारळ, ०२ उंबर, ०१ आंबा, ०१ पेरू, ०१ गुलमोहर, ०१ जांभुळ व ०१ सुपारी एकूण १० झाडे तोडणी आणि ३) कळंबोली सेक्टर - ५ E भू. क्रः ०९ येथील ०२ बदाम, ०४ शेवगा, ०१ नारळ, ०१ आंबा व ०१ कडुलिंब एकूण ०९ झाडे तोडणी अशी एकूण २३ झाडे हे दैनिक बाजार बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल. | ०१ जंगली व ०२ पडलेले मृत जंगली, ०२ आंबा, ०१ नारळ, ०१ कंडुलिंब, ०१ पेरु ०२ बदाम, ०१ जांभुळ, ०१ पेरु, ०१ सिताफळ, ०१ नारळ, ०१ अशोका एकूण १५ झाडे तोडणी व ०१ तगर, ०२ जंगली व ०१ फणस एकूण ०४ झाडे पुनर्रोपण अशी एकूण १९ झाडे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील १) कळंबोली, सेक्टर - १५ भू. क्र. ४३/A येथील ०१ जंगली व ०२ २) पडलेले मृत जंगली एकूण ०३ झाडे, कळंबोली सेक्टर -१५ भू. क्रः ३४A येथील ०२ आंबा, ०१ नारळ, ०१ कंडुलिंब व ०१ पेरु एकूण ०५ झाडे ३) कळंबोली सेक्टर -०६ भू. क्रः३A येथील ०२ बदाम, ०१ जांभुळ, ०१ पेरु, ०१ सिताफळ, नारळ, ०१ अशोका एकूण ०७ झाडे एकूण १५ झाडे तोडणी व ०१ तगर, ०२ जंगली व ०१ फणस एकूण ०४ झाडे पुनरोपण अशी एकूण १९ झाडे हे दैनिक बाजार बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल. | ०१ कदंब झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब कळंबोली मधील सेक्टर ०२, आसुडगाव बस डेपो, खांदा कॉलनी येथील ०१ कदंब झाड नवीन गटाराच्या बांधकामामध्ये बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र-PMC-PARK /30/2026-PTAD

राजकीय फेरफटका

# चेंढऱ्यातील मतदारांची आघाडीला पसंती





ही लढाई धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची



चेंढरे जिल्हा परिषद मतदार संघ हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदार संघात शेकापच्या माध्यमातून अनेक विकासकामे करण्यात आली आहेत. विकासकामे करताना शेकापने अलिबागचे पर्यटन कायम टिकून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. अलिबागची खरी ओळख पर्यटन आहे. या दृष्टीनेच शेकापने लक्ष देऊन विकासावर भर दिला आहे. ही लढाई धनशक्ती विरुद्ध जनशक्ती आहे. प्रचारादरम्यान मतदारांकडून जनशक्तीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या निवडणुकीत जनशक्तीलाच मताधिक्कार मिळणार, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

जिल्हा परिषद चेंढरे मतदार संघातील शेकाप, काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) महाविकास आघाडीतील उमेदवार एक उच्चशिक्षित आहेत. त्यांनी कोकण एज्युकेशन या शिक्षण संस्थेत ३५ वर्षे सेवा केली आहे. हजारो विद्यार्थ्यांना घडविण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अनेक सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमात योगदान दिले आहे. समाजसेवेचा ध्यास असणाऱ्या प्रवीणा घासे यांचे पती प्रमोद घासे हे थळमधील आरसीएफ कंपनीमध्ये ३७ वर्षे कार्यरत होते. नोकरी करीत असताना, ते सामाजिक कार्यात सहभागी होते. सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना, सहकार क्षेत्रातही त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. अलिबागमधील रायगड बाजारसारख्या संस्थेत ते उपाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. तर, प्रविणा घासे यांनी नवगाव ग्रामपंचायत सदस्य म्हणूनही यशस्वी काम केले आहे. नवगाव ग्रामपंचायतीच्या सदस्या म्हणून काम करीत असताना मतदार संघातील गावातील अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनातून आणि प्रमोद घासे यांच्याकडून मिळालेल्या प्रोत्साहनामुळे प्रवीण घासे या घराघरात पोहचल्या आहेत.

जिल्हा परिषद चेंढरे मतदार संघातील उमेदवार म्हणून शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आणि शेतकरी कामगार पक्षाने त्यांच्यावर एक जबाबदारी सोपवली आहे. जिल्हा परिषदेसाठी उमेदवारी देऊन सेवेची एक मोठी संधी पक्षश्रेष्ठींसह जनतेने दिली आहे. या निवडणकीच्या प्रचारात शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मनमानी कारभार आणि धनशक्तीच्या राजकारणाला येथील जनता कंटाळली असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीत जनशक्ती विरुद्ध धनशक्ती आहे. या निवडणूकीत जनशक्तीलाच मताधिक्कार मिळणार असा विश्वास प्रवीणा घासे यांनी व्यक्त केला आहे.

या मतदार संघाचा विकास अधिक वृद्धींगत व्हावा, यासाठी एक वेगळा मानस आहे. चेंढरे हा अलिबागच्या अगदी जवळ असणारा मतदार संघ आहे. चेंढऱ्याचा विस्तार दिवसेंदिवस होत आहे. वेगवेगळ्या कामाबरोबरच शिक्षणासाठी चेंढऱ्यात येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. नागरिकीकरण झपाट्याने वाढत असताना गावांतील गावपण व पर्यावरण कायम राहिल याकडे अधिक लक्ष दिले जाईल. रस्ते, पाणी आदी सुविधा उपलब्ध करून देताना चेंढरेसह अनेक गावांची ओळख कायम जपण्याचा प्रयत्न केला जाईल. रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यावर भर दिला जाणार आहे. निसर्ग व गावांचे सौंदर्य जपून विकास साधण्यावर भर देण्याचा मानस प्रविणा घासे यांनी व्यक्त केला.

# विकास हाच ध्यास









**आक्षी पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार प्रफुल्ल पाटील हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विकासाचा ध्यास घेत त्यांनी ही निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला आहे. आक्षी पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार प्रफुल्ल पाटील यांनी लहानपणापासूनच शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा हाती घेतला आहे. कष्टकरी, शेतकरी व कामगार वर्गाच्या विकासाचा ध्यास असणाऱ्या प्रफुल्ल पाटील यांना गेल्या अनेक वर्षापासूनचा राजकीय वारसा आहे. पक्षाचा सेवक म्हणून काम करण्यावर भर देणारे एक व्यक्तीमत्व म्हणून प्रफुल्ल पाटील यांच्याकडे पाहिले जाते. जनसामान्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्यावर अधिक लक्ष देणारे एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची एक ख्याती आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली या मतदारसंघात त्यांनी विकासाचा ध्यास घेतला आहे.**

जयंत पाटील यांच्यावर निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे पक्षासाठी काम करणारे व्यक्तीमत्व म्हणून प्रफुल्ल पाटील यांच्याकडे पाहिले जाते. तळागाळातील शेवटच्या घटकाशी संवाद साधण्याबरोबरच संपर्क साधणारा प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून ते ओळखले जातात. वेश्वी ग्रामपंचायतीच्या सदस्यपासून सरपंचापर्यंत राजकीय वाटचाल असणारे प्रफुल्ल पाटील यांनी सामाजिक क्षेत्रासह क्रिडा, शैक्षणिक क्षेत्रातही योगदान दिले आहे. ग्रामपंचायतीच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक विकासकामे मतदार संघात केली आहेत. वाडगाव फाटा येथे पाण्याचा प्रश्न होता, तो प्रश्न स्थानिकांना विश्वासात घेऊन त्यांनी सोडविला. एमआयडीसीमार्फत पाणी पुरवठा उपलब्ध करून दिला. गोंधळपाडा, वाडगाव फाटा, वेश्वी येथे अद्ययावत स्मशानभूमी बांधली असून तरुणांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी व्यायामशाळा तसेच खुली व्यायाम शाळा बांधण्यावर भर दिला. तसेच, उद्यान व प्रत्येक घरापर्यंत रस्ता तयार केला. आजपर्यंत त्यांनी अनेक उपक्रम वेश्वी ग्रामपंचायतीमध्ये राबविले.

प्रफुल्ल पाटील यांनी सामाजिक उपक्रम राबवित असताना क्रिडा शैक्षणिक उपक्रमाला महत्व दिले आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रोत्साहन कार्यक्रम घेण्यावर त्यांनी भर दिला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रफुल्ल पाटील यांनी पुढाकार घेत क्रिडा स्पर्धा घेऊन स्थानिक खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ देण्याचा प्रयत्न केला आहे. आरोग्यम धन संपदा हे ब्रीद वाक्य घेऊन शरीर सदृढ ठेवण्याकडे त्यांचे लक्ष कायम राहिले आहे. त्यामुळे त्यांची एक वेगळी ओळख आहे.

ग्रामपंचायतीच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक विकासकामे केली आहेत. ग्रामपंचायत हद्दीसह परिसरातील गावांमधील पाणी, रस्ते, आदी अनेक प्रश्न सोडविण्याचे काम त्यांनी केले आहे. तळवलीमध्ये विसर्जन घाट, स्मशानभूमी निवारा शेड, खंडाळा गावात जळीत शेड, स्मशानभूमी बांधली. बौद्धवाडीमध्ये प्रत्येकाच्या घरात शौचालय बांधले. नागरिकांची गैरसोय होऊ नये, म्हणून पोवाळेमधील पुल तातडीने बांधला. बेलकडेमध्ये सुसज्ज स्मशानभूमी, रस्ते, पिंडदान शेड बांधले. पंचायत समिती गणातील आक्षी गावात एमआयडीसीमध्ये पाण्याचे कनेक्शन उपलब्ध करून दिले. प्रफुल्ल पाटील यांनी केलेल्या अनेक विकासकामांमुळे त्यांचे पारड जड असून वेश्वीसह गोंधळपाड्यातील जनता बहुमत देतील, असा विश्वास महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे.

आक्षी पंचायत समिती गणातून निवडून आल्यावर मतदार संघाचा सर्वांगीण विकास हाच ध्यास असणार आहे. पंचायत व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अनेक योजना राबवून या मतदार संघाचा कायापालट करण्याचा त्यांचा मानस आहे. रस्ते, पाणी, समाज मंदिर आदी प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी कायमच केला असून भविष्यातही ते समाजहितासाठी कार्य करतील. गावे, वाड्यांमधील रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावले जातील. शिकलेल्या तरुणांना शेकापच्या माध्यमातून वेगवेगळ्या संस्थामध्ये रोजगार देण्याचा प्रयत्न केला आहे. आगामी काळात हाच प्रयत्न कायम ठेवून वेगवेगळ्या क्षेत्रात तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वास यानिमित्ताने त्यांनी व्यक्त केला.

# नागरिकांच्या हितासाठी काम करण्याचा निर्धार







चेंढरे पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार प्रिया दत्ताराम ढवळे आहेत. त्यांचे पती दत्ता ढवळे हे सर्वांनाच परिचित आहेत. राजकीय क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. दत्ता ढवळे हे नाव चेंढरेकरांना माहित नाही, असे होणार नाही. जनसामान्यांत रमणारी व्यक्ती म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. मदतीला धावणारे, सुख-दुखात हिरहीरीने सहभाग घेणारे म्हणून त्यांची एक वेगळी ख्याती आहे. चेंढरेतील स्मशानभूमीसह पाण्याचा प्रश्न सोडविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. गावातील रस्ते, पाणी, विजेची सुविधा, घंटागाडी तसेच अन्य मूलभूत गरजा याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. उपसरपंच म्हणून असताना त्यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रत्येक निर्णय गावकऱ्यांच्या हितासाठी घेतले आहेत. दत्ता ढवळे यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्या पत्नी प्रिया ढवळे या सामाजिक, राजकीय क्षेत्रात वाटचाल करीत आहेत. एक धाडसी नेत्या म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. ग्रामविकासाचा ध्यास घेऊन त्या पंचायत समितीची निवडणूक लढवत आहेत. निवडणूक लढवताना केवळ सत्ता मिळवण्याचा नव्हे, तर पंचायत समिती गणातील नागरिकांच्या हितासाठी काम करण्याचा निर्धार प्रिया ढवळे यांनी व्यक्त केला आहे.

लोकसेवा हीच त्यांची धारणा आहे. अनेक अडचणींवर मात करत, वेळप्रसंगी पदरमोड करुन गावाच्या विकासासाठी धडपड करणारे दाम्पत्य म्हणून प्रिया दत्ता ढवळे यांच्याकडे पाहिले जाते. संपूर्ण परिसराच्या कल्याणासाठी झटणारे एक नेतृत्व आहे. त्यांची कार्याची छाप चेंढरे पंचायत समिती मतदार संघात आजही कायम आहे माणसं जपणारे दांम्पत्य म्हणून प्रिया ढवळे व दत्ता ढवळे यांच्याकडे पाहिले जात आहे. गेल्या अनेक दिवसांपासून निवडणूकीच्या निमित्ताने ते घरोघरी जाऊन प्रचार करीत आहेत. त्यांना मतदारांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदारांकडून जल्लोषात स्वागत केले जात आहे. त्यामुळे माणुसकी जपणारे, हाकेला धावणारे ढवळे यांना बहुमत मिळणार, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.





# मिसाळांना जनाधार, मोहिते निराधार

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद गटातील निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसं राजकीय चित्र अधिक स्पष्ट होत चाललं आहे. कोर्लई मतदारसंघात जनतेत सातत्याने राहून काम करणाऱ्या, स्थानिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेणाऱ्या मिसाळ कुटुंबाला भक्कम जनाधार मिळत असताना, दुसरीकडे घराणेशाही, राजकीय गणितं आणि दबावतंत्रावर अवलंबून असलेले मोहिते मात्र जनतेपासून दुरावत असल्याचं वास्तव समोर येत आहे. सत्ता, प्रकल्पविरोधाचं राजकारण आणि युतींचे हिशेब मांडून निवडणूक जिंकण्याचे प्रयत्न फसत चालल्याने या मतदारसंघात "मिसाळांना जनाधार, मोहिते निराधार" हे चित्र ठळकपणे उमटत आहे.

जुना उसरोली आणि आताचा कोर्लई जिल्हा परिषद गटाची निवडणूक सध्या संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेत आहे. या गटावर गेली अनेक वर्षे उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व कायम असून, ही राजकीय पकड अजूनही भक्कम असल्याचे चित्र आहे. या जिल्हा परिषद गटातील ग्रामपंचायतींच्या मूलभूत सुविधांपासून ते जनतेला भेडसावणाऱ्या रोजच्या समस्यांवर प्रशांत मिसाळ यांनी अचूक बोट ठेवत सातत्याने काम केले आहे. प्रश्न मांडून थांबण्याऐवजी त्यावर उतारे शोधत जनतेचा विश्वास त्यांनी टिकवून ठेवला आहे. शेतकरी कामगार पक्ष आणि काँग्रेस पक्षानेही या कामांना ठाम पाठिंबा देत जनतेला वेळोवेळी दिलासा दिला आहे. त्यामुळे कोर्लई मतदारसंघात "मिसाळ" हे नाव केवळ उमेदवाराचं नव्हे, तर विश्वासाचं ब्रँड बनल्याचं चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. दुसरीकडे, अर्थकारण करून केवळ मंदिरे, सभागृहे उभारून जनतेला आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि मोहित्यांची जिंकण्याची "मनस्वी" इच्छा धुळीस मिळवण्यासाठी महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने सज्ज झाली आहे. विशेष म्हणजे, या लढतीत शिंदे गटानेही भारतीय जनता पार्टीविरोधात दंड थोपटल्याचे चित्र कोर्लई मतदारसंघात पाहायला मिळत असून, ही निवडणूक केवळ स्थानिक नव्हे तर राजकीयदृष्ट्याही निर्णायक ठरण्याची चिन्हे आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये ५९ गटांसाठी निवडणूक होणार आहे. यामध्ये मुरुड तालुक्यातील कोर्लई जिल्हा परिषद गटामध्ये तिरंगी लढतीचा सामना रंगणार आहे. जुन्या उसरोली जिल्हा परिषद गटाचे कोर्लई हे नामकरण नव्याने करण्यात आले आहे. या गटामध्ये शेतकरी कामगार पक्ष आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा नेहमी वरचष्मा राहिला आहे. या मतदार संघात राजश्री मिसाळ या रायगड जिल्हा परिषद सदस्य म्हणून यापूर्वीदेखील निवडून आल्या आहेत. यामुळे या मतदार संघातील गावे आणि वाड्यांमधील मूलभूत गरजांची माहिती त्यांच्याकडे आहे. त्यांनी त्यांचे पती प्रशांत मिसाळ यांच्या साथीने अनेक प्रश्न तडीस लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला असल्याचे सर्वश्रुत आहे. प्रशांत मिसाळ आणि राजश्री मिसाळ यांच्या पाठीशी आता शेतकरी कामगार पक्ष आणि काँग्रेस पक्षाच्या अनुभवी कार्यकर्त्यांची फळी काम करीत आहे. यामुळे प्रचारामध्ये असणारी गती आणि घरोघरी पोहचून मतदारांचा संपर्क अंतिम टप्प्यात आहे.

या मतदार संघात आपल्याला निवडणूक लढवून जिल्हा परिषदेमध्ये निवडून जाण्याचे स्वप्न भारतीय जनता पक्षाचे नेते महेश मोहिते यांनी गेल्या दहा वर्षांपूर्वीच पहिले आहे. मतदार संघात पडलेल्या आरक्षणामुळे त्यांचे स्वतःचे जिल्हा परिषद सदस्य होण्याचे स्वप्न भंगले. त्यांनी कोर्लई गटामधून त्यांच्या पत्नी अ‍ॅड. मनस्वी मोहिते यांची उमेदवारी पक्षाकडून मागून घेतली. त्यासाठी त्यांनी नेत्यांसमोर या मतदार संघाचे चित्र आपल्या बाजूने कसे आहे, हे रंगवून सांगितले. निवडणूक लढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून या मतदारसंघात प्रस्तावित असणाऱ्या बल्क फार्मा प्रकल्पाला सत्तेत राहून महेश मोहितेंनी विरोध करीत जनतेची मते जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा हा प्रयत्न फसला. काहीच जनता त्यांच्या सोबत राहिली. प्रकल्पाच्या आंदोलनात असलेल्या जनतेच्या उपस्थितीवरून त्यांनी या मतदार संघात उमेदवारी करण्यासाठीची केविलवाणी धडपड आजही सुरूच ठेवली आहे. ते शेवट पर्यंत जनतेला प्रकल्प येथून हद्दपार झाला आहे, असे सांगू शकले नसल्याने जनतेमध्ये त्यांच्याबाबतीत प्रचंड नाराजी पसरली आहे.

## राजश्री मिसाळांचे पारडे जड

या गटामध्ये १२ ग्रामपंचायती आहेत. यापैकी सात ग्रामपंचायतींमध्ये शिंदे गटाची सत्ता आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडे २ ग्रामपंचायती, शेतकरी कामगार पक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि भारतीय जनता पार्टी यांच्याकडे प्रत्येकी १ ग्रामपंचायत आहे. जरी या गटामध्ये सात ग्रामपंचायती शिंदे गटाकडे असल्यातरी उमेदवारी मिळवताना शिंदे गटामध्ये धुसफूस उडाली होती. शिंदे गटातील अंतर्गत राजकीय कलह पडद्याआड असला तरी त्या वादाचा फटका निश्चितपणे होणाऱ्या मतदानाला बसणार आहे. शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टी यांच्यामध्ये अंतर्गत कलहाची ठिणगी उडाली आहे. याउलट जनतेत राहून विकास करणाऱ्या, नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या राजश्री मिसाळ यांचे पारडे जड असल्याचे या मतदारसंघात दिसून येत आहे.

## आमदारांनी केला गेम

या मतदार संघात निवडून येण्यासाठी महेश मोहिते यांनी विधानसभा निवडणुकीत स्थानिक आमदारांच्या बाजूने काम केले. हे काम करताना जिल्हा परिषदेला मदत करण्याचा तह स्थानिक आमदार आणि महेश मोहिते यांच्यात झाला होता. हा तह करण्यामागे महेश मोहिते यांचा धुर्तपणा स्थानिक आमदारांनी ओळखला होता. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये शिंदे गट आणि भाजप अशी युती न झाल्याने स्थानिक आमदारांनी आपले रंग दाखवीत महेश मोहितेंच्या पत्नी मनस्वी मोहिते यांच्या विरोधात शिंदे गटाकडून ज्योती नागवेकर यांची उमेदवारी जाहीर करून भाजपच्या जागेला शह दिला आहे.

# सहन न होणारं सत्य

स्वतःची छाती छप्पन इंची असल्याचा दावा करणारे किती भित्रे, लबाड आहेत हे यापूर्वी अनेकदा दिसले आहे. संसदेत सध्या ज्या रीतीने राहुल गांधी व विरोधकांचा आवाज दडपण्याचा प्रकार चालू आहे त्यावरून प्रामाणिक सत्य सहन करण्याची यांच्यात हिंमत नाही हेच समोर येते आहे. २०२० मध्ये चीनने लडाखमध्ये आपल्यावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मोदींच्या सरकारने पळपुटेपणा केला असा राहुल गांधी यांचा आरोप आहे. यापूर्वीही त्यांनी ती वेगवेगळ्या निमित्ताने केला. आता तत्कालीन लष्करप्रमुख नरवणे यांच्या एका अप्रकाशित पुस्तकाचा हवाला राहुल देत आहेत. पुस्तकात जे म्हटले आहे ते खरे आहे की खोटे याबाबत न बोलता निव्वळ नियमांचा आडोशा घेऊन राहुल यांना संसदेत बोलण्यापासून गेले तीन दिवस रोखले जात आहे. या गदारोळात काँग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आठ खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. बुधवारी पंतप्रधानांचे भाषणही होऊ शकले नाही. चीनच्या हल्ल्याबाबत आजतागायत संसदेत चर्चा होऊ शकलेली नाही. याबाबत कधीही प्रश्न विचारण्यात आले तर ते दडपले जाते. ताजा वाद तेव्हाचे लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या पुस्तकावरून निर्माण झाला आहे. नरवणे हे संघविचारांशी जवळीक असलेल्या ज्ञानप्रबोधिनी संस्थेचे विद्यार्थी होते. त्यामुळे त्यांचे या सरकारशी चांगले जमेल असे वाटले होते. पण बहुदा त्यांनी आपल्या मराठी बाण्याला जागून निवृत्त झाल्यानंतर आपल्या आत्मचरित्रामध्ये चिनी आक्रमणाच्या वेळी नेमके काय घडले हे स्पष्टपणे लिहिले. २०२३ मध्ये यातील काही भाग पीटीआय या वृत्तसंस्थेने लेखाच्या स्वरुपात प्रकाशित केला होता. जानेवारी २०२४ मध्ये पेंग्विन या प्रतिष्ठित कंपनीमार्फत पुस्तक प्रकाशित होणार होते. चिनी सैन्य आपल्या सरहद्दीच्या आत घुसले होते असा दावा अनेक जाणकारांनी तेव्हा केला होता. पण कोणीही आलेले नाही व बाहेर गेलेले नाही असे सांगून तेव्हा मोदी यांनी त्याची वासलात लावणयाचा प्रयत्न केला होता. पण नरवणे यांच्या पुस्तकामुळे खुद्द लष्करप्रमुखच तो खोडून काढत आहेत असे जगासमोर येणार होते. त्यामुळेच घाईघाईने पुस्तकाचे प्रकाशन रोखण्यात आले.

## निर्णय घेण्याची हिंमत नाही

निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी पुस्तक लिहिण्यापूर्वी सरकारची परवानगी घ्यावी असा नियम पूर्वी नव्हता. ज्या काँग्रेसला भाजपवाले दिवसरात्र शिव्या देतात त्या काँग्रेसच्या काळात चीन हल्ल्याबाबत खुद्द नेहरुंवर टीका करणारे लिखाण त्यांच्या हयातीत व नंतर भरपूर प्रसिध्द झाले. त्याचा उपयोग करून संघ व भाजपने आजतागायत नेहरुंवर टीका केली. पण आता मोदींच्या चुका दाखवणारे थोडेही काही लिखाण प्रसिध्द होऊ पाहत असताना त्याची मुस्कटदाबी केली जात आहे. नरवणे हे अतिश गंभीर व जबाबदार अधिकारी आहेत. त्यांनी याला कोठेही राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यांचे पुस्तक गेले वर्षभर संरक्षण मंत्रालयाकडे मजकुराच्या तपासणीसाठी पडून आहे. त्यावर कोणताही निर्णय आलेला नाही. पुस्तकाच्या प्रती छापून पडून आहेत. मात्र नरवणे यांनी त्यावर कधीही कोणतेही भाष्य केलेले नाही. म्हणजेच त्यांचे म्हणणे कोण्या राजकीय हेतूने प्रेरित होते असे कोणीही म्हणू शकणार नाही. नरवणे यांनी २०२० मधील चिनी आक्रमणाच्या वेळचा घटनाक्रम यात सांगितला आहे. चिनी सैन्य जेव्हा भारतीय सरहद्दीच्या रोखाने येऊ लागले व जेमतेम काहीशे मीटरवर येऊन ठेपले तेव्हा नरवणे यांनी सरकारला पुढील कारवाईबाबत मार्गदर्शन मागितले. प्रथम त्यांनी संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांना फोन केला. अनेकदा फोन केल्यानंतर शेवटी मोदींशी त्यांचे बोलणे झाले. त्यावेळी तुम्हाला योग्य वाटेल ते तुम्ही करा असे उत्तर मोदींनी आपल्याला दिले असे नरवणे यांचे म्हणणे आहे. ही काही शहराच्या एखाद्या भागातील जातीय दंगल नव्हती, विचारणारे पोलिस आयुक्त नव्हते आणि आदेश देणारे मुख्यमंत्री नव्हते. हा दोन देशांच्या सीमेवरचा प्रश्न होता. चीन सैन्यावर तोफा डागण्याचा निर्णय लष्कराने घेतला असता तर दोन देशांमध्ये युध्द भडकण्याचा धोका होता. त्याचे परिणाम जागतिक स्तरावर होणार होते. त्यामुळे हा निर्णय पंतप्रधानांनी व जबाबदारीने घ्यायला हवा होता. आणि मोदी नेमका तोच घेण्याची टाळाटाळ करीत होते.

## खुनशीपणा

लष्करापुढे आणि जगापुढे आपली छप्पन इंची छातीची प्रतिमा मोदींना अबाधित ठेवायची होती. पण धडाक्याने निर्णय घेण्याची हिंमत मात्र ते दाखवू शकत नव्हते हेच नरवणे यांच्या लिखाणावरून समोर येणार होते. उद्या या निर्णयाचे विपरीत परिणाम झाले असते तर लष्करप्रमुख व लष्कराला बळीचा बकरा करून मोदी मोकळे झाले असते. त्यांच्या सोशल मिडियाने नरवणे यांना बदनाम करून टाकले असते. उलट समजा चीनने माघार घेतली असती तर त्याचे श्रेय घ्यायला मात्र हेच डरपोक लोक आणि त्यांचा नेता पुढे आला असता. राहुल गांधी यांना हेच सर्व संसदेच्या रेकॉर्डवर व देशापुढे आणायचे आहे. त्यासाठीच ते बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण भाजपचे खासदार आणि त्यांचेच पक्षपाती असलेले सभापती ओम बिर्ला त्यांना अडवत आहेत. यामुळे मिडियामधून मोदींच्या डरपोकपणाची अधिकच चर्चा होऊ लागली आहे हे पाहून काल बुधवारी भाजपवाल्यांनी निशिकांत दुबे नावाच्या एका बोलण्यात मवाली असलेल्या खासदाराला पुढे केले. भाजप अडचणीत आली की हा दुबे नेहमीच नेहरू, इंदिरा, राजीव वा सोनिया यांच्याविषयी खालच्या पातळीला जाऊन बोलतो. तसेच त्याने कालही केले. पण काँग्रेसच्या आठ खासदारांना निलंबित करणाऱ्या सभापतींना या दुबेवर कारवाई करावीशी मात्र वाटली नाही. चीनने लडाखच्या सीमेवर २०२० ते २०२४ या काळात सतत तणाव कायम ठेवला. २०२० मध्ये एप्रिलमध्ये झालेल्या पहिल्या चकमकीत अनेक जवान जखमी झाले. नंतर जूनमध्ये तर आपले वीस जवान मारले गेले. चीन आपल्या सरहद्दीत घुसून पुढे आला. नंतर तो स्वतःहून माघारी गेला. मात्र या गडबडीत दोन्ही देशांच्या सरहद्दीदरम्यान असलेला समाईक प्रदेश कमी झाला. आपली सीमा आत आली व पूर्वी आपले मेंढपाळ जिथे मेंढरे चरायला सहज घेऊन जाऊ शकत होते तो भाग चीनने बळकावला. तरीही यातले काहीही घडलेले नाही असे मोदी सरकारचे म्हणणे आहे. ते समजा खरे असेल तर संसदेत याबाबत स्वच्छ चर्चेची तयारी त्यांनी दाखवायला हवी. राहुल गांधी यांचे आरोप खोटे असल्याचे सप्रमाण सिध्द करायला हवे. त्याऐवजी त्यांचा आवाज दाबणे आणि त्यांच्या घराण्यावर, आता दिवंगत असलेल्या लोकांवर भयंकर घाणेरडे आरोप करणे हे भाजपचे त्याला उत्तर आहे. ही यांची तथाकथित संस्कृती आहे. स्वतःला उठसूठ देशभक्त म्हणवणारे हे लोक किती खोटारडे, भित्रे, लबाड आणि खुनशी आहेत हे या प्रसंगावरून पुन्हा दिसून आले आहे.

विचार

# रिझर्व्ह बँकेचा हात, चलनसाठ्याची साथ

महेश देशपांडे

*अर्थनगरीमध्ये वार्षिक अंदाजपत्र अर्थात बजेटचे वातावरण असले तरी काही महत्वाच्या बातम्याही लक्ष वेधून गेल्या. आर्थिक संकटात सापडलेल्या बँकांना रिझर्व्ह बँकेचा मदतीचा हात मिळणार आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात परकीय चलनसाठ्यात वाढ होत असल्याच्या बातम्या दखलपात्र ठरल्या. बाकी बदलत्या आर्थिक वातावरणामध्ये रिअल इस्टेट क्षेत्राच्या सरकारकडून मोठ्या अपेक्षा समोर आल्या आहेत.*

अर्थनगरीमध्ये वार्षिक अंदाजपत्र अर्थात बजेटचे वातावरण असले तरी काही महत्वाच्या बातम्याही लक्ष वेधून गेल्या. आर्थिक संकटात सापडलेल्या बँकांना रिझर्व्ह बँकेचा मदतीचा हात मिळणार आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात परकीय चलनसाठ्यात वाढ होत असल्याच्या बातम्या दखलपात्र ठरल्या. बाकी बदलत्या आर्थिक वातावरणामध्ये रिअल इस्टेट क्षेत्राच्या सरकारकडून मोठ्या अपेक्षा समोर आल्या आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँक बँकिंग प्रणालीमध्ये दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणार आहे. सध्याच्या तरलता आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर रिझर्व्ह बँकेने बँकिंग प्रणालीमध्ये तरलता आणण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँक बँकिंग प्रणालीमध्ये दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणार आहे. या हालचालीचा उद्देश आर्थिक आधार देणे हा आहे. केंद्रीय बँक तीन पद्धतींद्वारे बँकांना तरलता प्रदान करेल. सरकारी रोख्यांची खुल्या बाजारात खरेदी, डॉलर आणि रुपये खरेदी आणि विक्री करण्यासाठी परकीय चलन वापरण्याच्या योजनादेखील आहेत. रिझर्व्ह बँक ५ आणि १२ फेब्रुवारी रोजी प्रत्येकी ५० हजार कोटी किमतीचे बाँड खरेदी करत आहे. रिझर्व्ह बँक 'ओपन मार्केट ऑपरेशन्स' (ओएमओ) मार्गाखाली एकूण एक लाख कोटींचे सरकारी बाँडदेखील खरेदी करेल. रिझर्व्ह बँकेने सांगितले, की प्रत्येक उपाययोजनेंसाठी तपशीलवार सूचना स्वतंत्रपणे जारी केल्या जातील. शिवाय, रिझर्व्ह बँकेने सांगितले, की प्रत्येक 'लिक्विडिटी ऑपरेशन'साठी तपशीलवार सूचना स्वतंत्रपणे जारी केल्या जातील. तसेच ते लिक्विडिटी आणि बदलत्या बाजार परिस्थितीचे सतत निरीक्षण करेल आणि सुरळीत लिक्विडिटी प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी योग्य उपाययोजना करेल असेही म्हटले आहे.



भारतीय बँकांमधील अर्थतज्ज्ञांनी रिझर्व्ह बँकेला किमान तीन ते पाच लाख कोटींच्या 'ओपन मार्केट ऑपरेशन' (ओएमओ)साठी आपली वचनबद्धता स्पष्टपणे सांगण्याची विनंती केली आहे. त्यांचा युक्तिवाद आहे, की अशा आश्वासनांमुळे सरकारी रोखे उत्पन्न कमी होण्यास मदत होईल आणि मागील धोरणात्मक व्याजदर कपातीचा परिणाम अधिक जलदपणे पसरेल. २१ आणि २२ जानेवारी रोजी झालेल्या धोरणपूर्व सल्लामसलत बैठकींमध्ये या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली होती. त्यात रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा, डेप्युटी गव्हर्नर पूनम गुप्ता आणि चलनविषयक धोरण विभागाचे प्रभारी कार्यकारी संचालक इंद्रनील भट्टाचार्य उपस्थित होते. घट्ट प्रणाली तरलता, मजबूत कर्जवाढ आणि परकीय चलन बाजारात रिझर्व्ह बँकेचा सतत हस्तक्षेप यामुळे मागील 'ओएमओ' खरेदीचा तरलता परिणाम मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. अर्थतज्ज्ञांनी सांगितले, की सहभागींनी तरलतेची कमतरता, नवी चलनवाढ आणि जीडीपी वाढीच्या साखळीबद्दल अनिश्चितता यांदरम्यान उच्च ठेव प्रमाणपत्र (सीडी) दरांबद्दल चिंता व्यक्त केली. एका सहभागीने सुचवले, की रिझर्व्ह बँकेचे तरलता गळती कमी करण्यासाठी परकीय चलन बाजार हस्तक्षेपाची तीव्रता कमी करण्याचा विचार करावा. फेब्रुवारीच्या धोरण बैठकीत मध्यवर्ती बँकेने व्याजदरात कपात करण्यापासून परावृत्त करावे आणि त्याऐवजी नवीनतम महागाई आणि जीडीपी मालिका डेटा उपलब्ध होण्याची वाट पहावी, यावर व्यापक एकमत झाल्याची माहिती अर्थतज्ज्ञांनी दिली. दरम्यानच्या काळात समोर आलेली एक दखलपात्र बातमी म्हणजे जागतिक आर्थिक अनिश्चितता आणि डॉलरच्या चढउतारांमध्ये देशाच्या परकीय चलनसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. यामुळे बाजार आणि अर्थव्यवस्थेला दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार १६ जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा ७०१.३६ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला. ही वाढ देशाची आर्थिक स्थिती मजबूत करण्याचे लक्षण मानली जात आहे. परकीय चलन आणि सोन्याच्या साठ्याच्या मजबुतीमुळे १६ जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा १४.१७ अब्ज डॉलर्सने वाढला. परिणामी, एकूण साठा ७०१.३६ अब्ज डॉलर्सवर पोहोचला. १७ ऑक्टोबरनंतरची ही सर्वोच्च पातळी ठरली. या आकडेवारीवरून देशाची बाह्य आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे स्पष्ट होते. तज्ज्ञांच्या मते, जागतिक अनिश्चिततेच्या काळात ही बातमी आली आहे. परकीय चलनसाठ्यात झालेली ही वाढ देशाला दिलासा देऊ शकते, कारण ती संरक्षक कवच म्हणून काम करते. या आठवड्यात देशाच्या सोन्याच्या साठ्यातही वाढ झाली. साठ्यात ४.६२३ अब्ज डॉलर्सची वाढ झाली. त्यामुळे एकूण सोन्याचा साठा ११७.४५४ अब्ज डॉलर्सच्या नवीन विक्रमी उच्चांकावर पोहोचला. जागतिक बाजारपेठेत सुरू असलेल्या चढउतारांमध्ये सोने एक विश्वासार्ह मालमत्ता बनते. हे साठे केवळ अमेरिकन डॉलरचाच विचार करत नाहीत, तर युरो, जपानी येन आणि ब्रिटिश पाउंडसारख्या इतर प्रमुख चलनांचाही देशाच्या परकीय चलनसाठ्यात समावेश आहे. आता एक लक्षवेधी बातमी रिअल इस्टेट विश्वातली. येत्या काळात रिअल इस्टेट क्षेत्राच्या सरकारकडून अनेक अपेक्षा आहेत. उद्योगविश्वाला आशा आहे, की सरकार पायाभूत सुविधांच्या विकासाला आणखी गती देईल, कनेक्टिव्हिटी सुधारेल आणि नवीन निवासी आणि व्यावसायिक कॉरिडॉर विकसित करेल. गृहखरेदीदारांसाठी कर प्रोत्साहने वाढवणे, विशेषतः गृहकर्जांवरील व्याज सवलती आणि परवडणाऱ्या घरांना प्रोत्साहन देणे यामुळे मागणी वाढू शकते. याव्यतिरिक्त, जीएसटीचे तर्कसंगतीकरण, सोपी वित्तपुरवठा आणि जलद मंजुरी प्रक्रिया विकासकांसाठी प्रकल्प अधिक व्यवहार्य बनवतील. स्थिर आणि दूरदर्शी अर्थसंकल्प रिअल इस्टेटला आर्थिक वाढ आणि रोजगार निर्मितीसाठी एक मजबूत आधार बनवू शकतो. 'भुतानी इन्फ्रा'चे 'सीईओ' आशिष भूतानी म्हणाले, की रिअल इस्टेट क्षेत्राला धोरणात्मक उपक्रमांची अपेक्षा आहे. ते गुंतवणूक अधिक सुलभ करतील. पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देतील आणि शाश्वत शहरी विकासाला मजबूत आधार देतील.

कर आकारणीचे तर्कसंगतीकरण, मेट्रो आणि एक्सप्रेसवे कनेक्टिव्हिटीचा विस्तार आणि हरित आणि कल्याण-आधारित विकासाला प्रोत्साहन यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास लक्षणीयरीत्या वाढू शकतो. स्थिर आणि भविष्यवादी धोरणात्मक वातावरण केवळ व्यावसायिक आणि मिश्र वापराच्या रिअल इस्टेटमध्ये दीर्घकालीन मूल्यनिर्मिती सक्षम करेल असे नाही तर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आणि एकूण आर्थिक गती टिकवून ठेवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावेल. 'हिरो रिॲल्टी'चे 'सीईओ' रोहित किशोर म्हणतात, की केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ जवळ येत असताना, नोएडाचा रिअल इस्टेट बाजार एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच सुरू होत असल्यामुळे आणि एक्सप्रेस वे तसेच मेट्रो विस्ताराद्वारे सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे हा प्रदेश आधीच उच्च-वाढीचा निवासी आणि व्यावसायिक कॉरिडॉर बनला आहे. श्री. रोहित किशोर पुढे म्हणतात, की या क्षेत्रात कॉर्पोरेट्स, डेटा सेंटर्स, जीसीसी आणि जागतिक उत्पादन कंपन्यांचे आगमन अंतिम वापरकर्त्यांची मागणी वाढवत आहे. अशा वेळी लक्ष्यित आर्थिक मदत महत्त्वाची ठरते. घर खरेदीदारांसाठी करप्रोत्साहने, विशेषतः कलम २४(ब) अंतर्गत व्याजकपात वाढवून पाच लाख रुपये केल्याने मागणी टिकून राहील आणि घराची मालकी सुलभ होईल. शिवाय मिश्र वापर विकास, भाडेपट्टा आणि शेवटच्या मैलाच्या पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांमुळे अर्थव्यवस्था परिपक्व, स्वयंपूर्ण शहरी बनण्यास मदत होईल. 'रामा ग्रुप'चे संचालक प्रखर अग्रवाल म्हणाले, की २०२६ चा अर्थसंकल्प हा शहरांच्या पलीकडे आणि देशभरातील गृहनिर्माण क्षेत्राला आकार देण्याची एक उत्तम संधी आहे. टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील लोक आता स्वतःची घरे खरेदी करण्यात अधिक रस घेत असून खऱ्या खरेदीदारांकडून मागणीदेखील वाढत आहे. सरकारने योग्य धोरणे लागू केल्यास ही वाढ आणखी वेगवान होऊ शकते. बांधकामावरील जीएसटी सुलभ करणे, घर खरेदीदारांना अधिक कर सवलती देणे, घरांच्या किमती परवडणाऱ्या ठेवणे आणि शहरांमध्ये रस्ते, वाहतूक आणि कनेक्टिव्हिटीमध्ये सतत गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यामुळे घराची मालकी सुलभ होईल आणि देशभरात रिअल इस्टेटच्या वाढीला चालना मिळेल.

# भारतीय आर्थिक विषमतेचे वास्तव चिंताजनक

सुयोग आंग्रे

भारतीय आर्थिक विषमतेचे वास्तव चिंताजनक आज भारत ही जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनली असताना या चकाकणाऱ्या आकडेवारीच्या समांतर उभ्या असलेल्या आर्थिक विषमतेचे वास्तव चिंताजनक आहे. एकीकडे जागतिक स्तरावर भारताचा लौकिक वाढत असताना, दुसरीकडे देशातील श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी ऐतिहासिकदृष्ट्या रुंदावत चालली आहे, हा खोल विरोधाभास आहे. केवळ जीडीपीच्या वाढीच्या दराने विकासाचे मूल्यमापन करणे निरर्थक आहे, कारण हा आकडा संपत्तीच्या वितरणाचे चित्र नसून सरासरी उत्पन्नाचे चित्र मांडतो. देशाच्या वाढत्या संपत्तीचा एक मोठा भाग मूठभर अतिश्रीमंतांच्या तिजोरीत जात आहे, तर श्रमशक्तीचा एक मोठा वर्ग अजूनही जीवनाच्या मूलभूत गरजांसाठी झगडत आहे, हे जमीनी वास्तव आहे. ही विषमता केवळ आर्थिक आकडेवारी नाही तर आपल्या लोकशाहीचा पाया असलेल्या सर्वसमावेशक विकासाच्या दाव्यांवरील गंभीर प्रश्न आहे.या विषमतेचे सर्वात भयंकर रूप आपण कोविड नंतरच्या साथीच्या काळात पाहिले. तो काळ असा होता जेव्हा संपूर्ण जग ठप्प झाले होते, पण संपत्तीचा खेळ थांबला नाही. एकीकडे लाखो मध्यम आणि निम्नवर्गीय कुटुंबांची बचत आणि भांडवल उपचाराअभावी, जीवन आधार आणि बेरोजगारीमुळे बुडाले. आपल्या कष्टाने दारिद्र्यरेषेच्या वर आलेले करोडो लोक पुन्हा खाली ढकलले गेले. छोटे व्यवसाय बंद झाले, नोकऱ्या गेल्या आणि स्थलांतरित मजुरांच्या त्रासदायक चित्रांनी आपल्या सामूहिक विवेकाला धक्का बसला. दुसरीकडे, याच काळात देशातील आघाडीच्या उद्योगपतींच्या संपत्तीत ऐतिहासिक आणि अकल्पनीय वाढ नोंदवण्यात आली. सामान्य माणूस मासिक कर्जाचे हप्ते भरण्यासाठी धडपडत असतानाच शेअर बाजार तेजीत होता. अर्थशास्त्रज्ञांनी त्याला 'असममित सुधारणा' असे नाव दिले. ही अशी परिस्थिती होती की अर्थव्यवस्था दोन विरुद्ध दिशेने विभागली गेली होती. एकीकडे संघटित आणि श्रीमंत वर्ग वरच्या दिशेने जात होता, तर दुसरीकडे असंघटित आणि गरीब वर्ग रसातळाला जात होता. महागाईमुळे सामान्य माणसाला आपल्या ताटातील भाजीपाला आणि डाळी कमी कराव्या लागतात आणि त्याचवेळी देशात महागडी वाहने आणि चैनीच्या वस्तूंच्या विक्रीचे नवनवे विक्रम होतात, तेव्हा समाजाचा समतोल बिघडला आहे, असे समजावे. या असमतोलाची मुळे आपली धोरणे आणि कर प्रणालीमध्ये खोलवर रुजलेली आहेत. गेल्या काही दशकांत उदारीकरणाच्या नावाखाली आपण स्वीकारलेल्या भांडवलशाही रचनेचा मूळ मंत्र होता 'गळतीचे तत्त्व'. असे मानले जात होते की जर आपण वरच्या आणि मोठ्या कॉर्पोरेट स्ट्रक्चर्समधील लोकांना समृद्ध केले, त्यांना कर सवलत दिली, तर ते गुंतवणूक करतील आणि रोजगार आणि वेतनाच्या रूपात त्याचे फायदे तळापर्यंत पोहोचतील. आपली करप्रणाली, विशेषत: 'वस्तू आणि सेवा कर' म्हणजेच अप्रत्यक्ष कर रचना, या आगीत आणखीनच भर घालते. अप्रत्यक्ष कर त्यांच्या स्वभावात प्रतिगामी असतात, कारण ते गरीब आणि श्रीमंतांवर जवळजवळ समान भार लादतात. आकडेवारीवरून असे दिसून येते की कर संकलनाचा मोठा हिस्सा हा निम्न आणि मध्यमवर्गीयांच्या खिशातून येतो. यासोबतच बड्या औद्योगिक घराण्यांना मिळणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या करसवलती आणि कर्जमाफी याला अर्थव्यवस्थेसाठी 'प्रोत्साहन' असे संबोधले जाते. दुसरीकडे शेतकऱ्यांची कर्जमाफी, वृद्धापकाळ पेन्शन किंवा गरिबांसाठी रेशनचा प्रश्न आला की त्याला 'मोफत रेवारी' म्हणत अपमान केला जातो. या दुहेरी मानकामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि समाजात असंतुलन निर्माण होते. विषमतेचे हे विष केवळ बँक खाती आणि आर्थिक आकडेवारीपुरते मर्यादित नाही, तर ते हळूहळू समाजाच्या शिरपेचात शिरते आणि 'संधीची समानता' नष्ट करते. ग्रामीण भारतातील परिस्थितीकडेही आपण विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, जिथे देशातील बहुसंख्य लोक अजूनही राहतात. शहरांमधील चकाकणाऱ्या गगनचुंबी इमारती, वेगवान गाड्या, रुंद महामार्ग आणि मोठ्या बाजारपेठा वेगळीच कथा सांगतात, तर खेड्यातील शांतता आणि निराशा वेगळीच कथा सांगतात. एकेकाळी मानाचा व्यवसाय असलेला शेती आज तोट्याचा व्यवसाय बनला आहे. खते, बियाणे आणि इंधनाचा खर्च वाढत आहे, पण पिकाची योग्य 'किमान आधारभूत किंमत' मिळत नाही. खेड्यांकडून शहरांकडे लोकांचे अनियंत्रित स्थलांतर हे याच आर्थिक मजबुरीचे परिणाम आहे. या स्थलांतरामुळे शहरांच्या पायाभूत सुविधांवरही ताण पडत आहे आणि नव्या प्रकारचा नागरी वर्ग संघर्ष निर्माण होत आहे. खेड्यांकडून शहरांकडे लोकांचे अनियंत्रित स्थलांतर हे याच आर्थिक मजबुरीचे परिणाम आहे. या स्थलांतरामुळे शहरांच्या पायाभूत सुविधांवरही ताण पडत आहे आणि नव्या प्रकारचा नागरी वर्ग संघर्ष निर्माण होत आहे.

आजच्या जगात, माहिती ही शक्ती आहे आणि ही शक्ती ज्यांच्याकडे आधुनिक संपर्क साधने, संगणक आणि हाय-स्पीड इंटरनेट सुविधा आहेत त्यांच्याकडे आहे. अशा परिस्थितीत सर्वप्रथम आपल्याला विकासाची व्याख्या बदलावी लागेल. जीडीपीच्या पलीकडे जाताना, आपल्याला 'मानवी विकास', 'आनंद' आणि 'असमानतेची पातळी' हे प्रगतीचे मुख्य मापदंड बनवायचे आहेत. आरोग्य आणि शिक्षणावरील सरकारी खर्च मोठ्या प्रमाणात वाढवावा लागेल. याशिवाय करप्रणालीतही सुधारणा करावी लागणार आहे. रोजगाराच्या आघाडीवर आपल्याला सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन द्यावे लागेल. न्याय्य किमान वेतन सुनिश्चित करणे आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या कक्षेत आणणे हे सरकारचे प्राधान्य असले पाहिजे. आपल्याला एक समतावादी समाज घडवायचा आहे जिथे प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार असेल.

## लोकसंसद

### रासायनिक टँकर म्हणजे 'धावते बॉम्ब'

पुणे-मुंबई महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ 'प्रोपिलीन' हा अत्यंत ज्वलनशील हायड्रोकार्बन वायू घेऊन जाणारा एक गॅस टँकर उलटला आणि या उलटलेल्या गॅस टँकरने महामार्गावर तब्बल ३२ तासांची अभूतपूर्व अशी वाहतूक कोंडी केली. त्यामुळे सुमारे २५ किलोमीटरपर्यंत लागलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगांमध्ये अडकलेल्या हजारो लोकांचे २४ तासांहून अधिक काळ अन्नपाण्यावाचून प्रचंड हाल झाले. मुळात धोकादायक रासायनिक पदार्थांच्या गळतीची अशी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास ती कशी हाताळावी या बाबतीत विविध यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव आणि संभ्रम दिसून येत होता. कारण 'या महामार्गावर अपघात झाला आहे. पुढील सूचना मिळेपर्यंत या महामार्गावर येऊ नये. पर्यायी मार्गाचा वापर करावा' एवढेही सांगण्याचे सौजन्य संबंधित यंत्रणांनी दाखविले नाही. दुसरीकडे प्रचंड वाहतूक कोंडी झाली असली तरी वाहन चालकांकडून टोल वसुली मात्र नित्य नियमाने केली जात होती. खरे तर रस्त्यावरील रासायनिक टँकर हे अनेकदा अतिज्वलनशील, विषारी आणि स्फोटक पदार्थ वाहून नेत असल्यामुळे सार्वजनिक सुरक्षेसाठी मोठा धोका मानले जातात. त्यामुळे त्यांना 'धावते बॉम्ब' असे म्हटले जाते. परदेशात अशा धोकादायक टँकरच्या मागे पायलट आणि रसायन तज्ज्ञ पथक असणे अनिवार्य असते. मात्र आपल्याकडे सार्वजनिक सुरक्षेच्या मुद्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने या बाबतीत सगळाच आनंदी आनंद आहे. 'धावत्या बॉम्ब'च्या या दुर्घटनेतून संबंधित यंत्रणा काही सकारात्मक धडा घेतील अशी अपेक्षा आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज चौथा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# तोतया पोलिसांचा पर्दाफाश

## नवी मुंबई गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी

## तिघांना अटक; १५ लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त

। पनवेल । प्रतिनिधी ।

स्वस्त सोन्याच्या बहाण्याने सांगलीतील व्यापाऱ्याला खारघरमध्ये बोलावून, पोलीस असल्याची बतावणी करत त्याच्या जवळील १३ लाख २५ हजारांची रोकड लुटणाऱ्या टोळीचा नवी मुंबई गुन्हे शाखेने यशस्वीरीत्या छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. विशाल बाजीराव तुपे (वय ३५, घणसोली), रोहित राजाराम शेलार (वय २६, कोपरखैरणे) आणि मनोज अंकुश भंडारी (वय ३७, कल्याण) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार, दुचाकी आणि रोख रकमेसह एकूण १५ लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



तसेच, या टोळीत सहभागी असलेल्या इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

या गुन्ह्यातील टोळीने सांगलीतील साखर व्यापारी मनीष शिंदे यांना स्वस्त सोन्याचे आमिष दाखवून त्यांना खारघरमध्ये बोलावून घेतले होते.

त्यानुसार १२ जानेवारी रोजी मनीष शिंदे रक्कम घेऊन आले असता, एका कारमधून आलेल्या टोळक्याने पोलीस असल्याचे भासवले. त्यानंतर त्यांच्यावर धाड टाकल्याचा बनाव करत शिंदे यांच्याकडे असलेली १३ लाख २५ हजारांची बॅग हिसकावून पोबारा केला होता. या प्रकरणात खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात टोळीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखेने या गुन्ह्याचा तपास सुरू केला होता. त्यासाठी गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाने घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, या गुन्ह्यात वापरलेल्या कारवर बनावट नंबर प्लेट असल्याचे आढळले. तसेच मोटारसायकलवरुन देखील काही आरोपी सोबत असल्याचे आढळून आले. त्यानंतर गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने तांत्रिक विश्लेषणद्वारे विशाल तुपे, रोहित शेलार आणि मनोज भंडारी या तिघांना नवी मुंबई व कल्याण परिसरातून अटक केली. या कारवाईत पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून कार, दुचाकी तसेच विविध कंपन्यांचे मोबाईल आणि रोख असा एकूण १५ लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस वर्दीचा गैरवापर करून लुटमार करणाऱ्या टोळीचा यशस्वीरीत्या कारवाई करत पर्दाफाश केल्याने नवी मुंबई गुन्हे शाखेचे कौतुक करण्यात येत आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### ६ फेब्रुवारी

१)श्रीम.ज्योत्स्ना विनोद नाईक ब्राम्हणआळी, अलिबाग ०६-०२-१९५२

२)श्री.विश्वनाथ शिमगा भगत मु.कोळीवाडा, अलिबाग ०६-०२-१९५३

३)रमेश काशिनाथ पडते रामनाथ, अलिबाग ०६-०२-१९५८

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**शहीद निलेश नारायण तुणतुणे, जयंतीनिमित्त, सहान गोठी अलिबाग**



**स्नेहा सतीश कर्वे, वाढदिवस अलिबाग**

---

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मृताचे नाव संजय राजवाडीया (पत्ता माहिती नाही) वय अंदाजे ४५ वर्षे, केस काळे-पांढरे, छातीवर उजव्या बाजूला गोंधलेले अस्पष्ट चिन्ह व जुन्या जखमाचे वण्र, अंगात निळसर रंगाचे फुलांची डिझाईन असलेला हाफ बाह्यांचा शर्ट व पांढऱ्या-चॉकलेटी रंगाची चेक्स असलेली लुंगी आहे. तरी वरील वर्णनाचे इसम याचे नातेवाईकांबाबत काही माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क करावा.

---

## बेळगाव प्रदर्शनात वरद गावंडच्या जलरंगांची निवड

। उरण । प्रतिनिधी ।

बेळगाव कर्नाटक येथील के. बी. कुलकर्णी स्मृती दिनानिमित्ताने २०२६ चित्रकला प्रदर्शनामध्ये देवरुख कॉलेज ऑफ फाईन आर्टचा विद्यार्थी तथा उरण तालुक्याचे सुपुत्र वरद विलास गावंड याने काढलेले शांततेच्या प्रवासात हे जलरंग चित्र निवडण्यात आले आहे. हे चित्र संधिप्रकाशातील समुद्राची संथ आणि शांत अवस्था अचूकपणे टिपते. निळ्या रंगाचे शीड असलेले एक छोटे जहाज संथ लाटांवर विसावले असून, ते समुद्राच्या शीतल छटांशी एकरूप झाले आहे. आकाशात रंगांची जणू एक मैफलच भरली आहे. गर्द निळा रंग हळूहळू गडद केशरी आणि कोमल



पिवळ्या रंगात मिसळत मावळत्या सूर्याचे सात्विक सौंदर्य प्रतिबिंबित करत आहे. क्षितिजावर पक्ष्यांचे थवे मुक्तपणे विहार करत असून ते स्वातंत्र्याची जाणीव करून देतात. ही कलाकृती एकांत आणि निसर्ग अन् मानवाच्या चिरंतन नात्याचे दर्शन घडवते. हे प्रदर्शन बेळगाव येथील वरेरकर नाट्य संघाच्या के. बी. कुलकर्णी आर्ट गॅलरीत ४ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पहावयास मिळेल.

---

## तरुणाची आत्महत्या

**पनवेल :** सेक्टर-७ मधील कोस्मो को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमध्ये राहणाऱ्या एका ३५ वर्षीय तरुणाने कौटुंबिक वादाला कंटाळून आत्महत्या केली. सौरभ मिश्रा असे या तरुणाचे नाव असून, त्याने 'सेल्फोस' नावाची विषारी पावडर घेतल्याचे समोर आले. २०२२ मध्ये सौरभचा विवाह झाला होता, मात्र काही महिन्यांतच पती-पत्नीमध्ये वाद झाल्याने हे प्रकरण थेट कोर्टात पोहोचले. तेव्हापासून तो मानसिक तणावाखाली होता. २ फेब्रुवारी रोजी त्याचे आई-वडील गावी गेलेले असताना, त्याने विषारी पावडर प्राशन केली. आई-वडील परतले असता, त्यांना तो बेशुद्धावस्थेत आढळला. त्यांनी त्याला रुग्णालयात दाखल केले, परंतु, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

---

## साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन

**नागोठणे :** नागोठणे गवळ आळीतील श्री राधाकृष्ण साईबाबा गणपती मंदिराचा नववा वर्धापनदिन मंगळवारी (दि.३) भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ७ वाजता मूर्तिअभिषेक, सकाळी ८ वाजता ध्वजारोहन, श्री सत्यनारायण महापूजा, सायंकाळी हळदीकुंकू, हरिपाठ, त्यानंतर श्रीवर्धन येथील प्रसिद्ध कीर्तनकार हभप हरिश महाराज दिघीकर यांचे कीर्तन, रात्री महाप्रसाद कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांनी वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

---

## रस्तासुरक्षा जनजागृतीसाठी बाईक रॅली

। कोलाड । प्रतिनिधी ।

पातळगंगा औद्योगिक क्षेत्रात नामांकित असलेली इदेमित्सु लुब इंडिया प्रा. लिमिटेड कंपनी दरवर्षी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान राबवित असते. सामाजिक बांधिलकी जपत इदेमित्सु दरवर्षी अग्निशामक प्रशिक्षण, बचावात्मक ड्रायव्हिंग प्रशिक्षण, दृष्टी जागरूकता कार्यक्रम आणि नेत्रे तपासणी शिबिर, एचआयव्ही चाचणी शिबीर आणि रस्ता सुरक्षा जागरूकता बाईक रॅली, असे उपक्रम राबवून जनजागृती मोहीम करून एक वेगळा संदेश देत असते.

या बाईक रॅलीच्या वेळी इदेमित्सु कंपनीचे उपव्यवस्थापकीय



संचालक अकिनोरी हारा यांनी हिरवा झेंडा दाखवून बाईक रॅलीला प्रारंभ केला. नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमाबद्दल जनजागृती निर्माण होणे, अपघात टाळण्यासाठी हेल्मेटचा वापर करणे, वेगावर नियंत्रण आणि वाहतुकीचे नियम वाहन चालवितांना पाळावे अशी जनजागृती करण्यात आली. कंपनीपासून ६ किलोमीटर अंतरावर पुन्हा त्याच मार्गी रॅलीची सांगता करण्यात आली. या रॅलीमध्ये कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, सह अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार असे १४० दुचाकीस्वार सहभागी झाले होते. यावेळी रसायनी पोलीस स्टेशनचे विशेष सहकार्य लाभले.

---

## जादा परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक




### अज्ञातावर गुन्हा दाखल

। पनवेल । प्रतिनिधी ।

ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करून चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून ५६ लाख २० हजारांची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय श्रीवास्तव हे सेवानिवृत्त असून, त्यांनी त्यांच्या व्हॉट्सॲपवर एक वेब लिंक दिसली. त्यांनी या लिंकवर क्लिक केल्याने ते या ग्रुपमध्ये जोडले गेल्याने त्यांनी ऑनलाइन पैसे पाठवण्यास सुरुवात करून शेअर्स खरेदी विक्री केली. गुंतवणूक झालेला नफा वेबसाईटवर दिसत होता. त्यावर त्यांना शेअर्समध्ये गुंतवणूक आणि होणारा फायदा दर्शवून वेगवेगळ्या बँक खात्यांवर थोडे थोडे करुन ५६ लाख २० हजार रुपये पाठवल्यानंतर झालेला नफा १ कोटी ५० लाख इतका दिसत होता. त्यांनी रक्कम काढण्यासाठी प्रक्रिया केली असता विनंती अमान्य करण्यात आली. तसेच टॅक्स भरावा लागेल, असे सांगून पुन्हा पैशाची मागणी करण्यात आली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली.

---

## ट्रकचालकाला मारहाण करणाऱ्या त्रिकुटाला अटक

**पनवेल :** भांडणाचा राग मनात धरुन ट्रक चालकाला तलवारीने मारहाण केल्याप्रकरणी त्रिकुटाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पनवेल जवळील बिंदु धाब्याच्या बाजूला पार्कींग जागेत, पुष्पकनगरजवळ फिर्यादी अशोककुमार अंग्रेजसिंग (४५) हा असताना आरोपी मुनिष कुमार रामलुभाया शर्मा (४५), जसपाल दारासिंग (वय ३२, रा. पंजाब) व राजकुमार रोशनलाल (४४), सर्व रा.मु. मजहोली, ता. नालगढ जि. सोलन, राज्य हिमाचल प्रदेश यांनी आपसात संगणमत करून मनिषकुमार याच्याबरोबर झालेल्या भाडणांचा राग मनात धरून हाताचापटीने मारहाण करून व शिवीगाळी केली. मुनिष कुमार रामलुभाया शर्मा, याने त्याच्या हातातील लोखंडी तलवारीने त्याच्या उजव्या मांडीवर वार करून जखमी केले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक हजरत पठाण व पो.ना.प्रवीण मेथे व पथकाने या त्रिकुटाला ताब्यात घेतले आहे.

---

## पर्यटन विकासासाठी उत्तम पायाभूत सुविधा गरजेची: डॉ.राज कल्याणी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुका सहयाद्रीच्या पर्वत रांगेतील कुशीत वसलेले एक सुंदर रमणीय, नैसर्गिक वरदहस्त लाभलेला, पर्यटकांना आकर्षित करणारा आहे. परंतु, सुविधांअभावी पर्यटक याठिकाणी जास्त दिवस थांबत नाही. याठिकाणचे एक दोन पर्यटन क्षेत्र बघतात आणि निघून जातात. तरी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व पर्यटन विकासासाठी उत्तम पायाभूत सुविधा असणे गरजेचे आहे, असे मत डॉ. राज कल्याणी यांनी केले.

मुरूड शहर नारळ, सुपारी झाडाने वेढलेली आहे. ही झाडे पर्यटकांना आकर्षित करत असतात.



रिकाम्या परिसरात पडीक झालेल्या झावळ्यापासून चांगले आकर्षित खोली बनवली तर नक्कीच पर्यटक या ठिकाणी आकर्षित होतील आणि याठिकाणी रोजगार वाढेल. मुरूडमध्ये विविध पर्यटन क्षेत्र असून पर्यटकांना माहिती देण्यासाठी गाईड्सची उपलब्धता नाही आहे. दर्जेदार रस्ते, स्वच्छतागृहे, सुलभ पर्यटनासाठी हाय-स्पीड इंटरनेट, पिण्याचे पाणी, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन आणि डिजिटल पेमेंट, पर्यटन स्थळांवर सुरक्षेची हमी, हॉटेल्स, स्वच्छता, आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी यांसारख्या सुविधांचे नियोजन आणि निर्मिती, स्थानिक रोजगार निर्मितीसह पर्यटनस्थळांना जागतिक स्तरावर आकर्षित करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. या सुविधांच्या नियोजनबद्ध मांडणी केली तर पर्यटकांना आकर्षित करण्यात मदत होईल. त्यातूनच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून शाश्वत विकासाला मोठी मदत होईल, असे मत डॉक्टर राज कल्याणी यांनी केले.

---

२५ हून अधिक देशांचा सहभाग

मराठी उद्योजकांसाठी जागतिक व्यासपीठ

# दुबईमध्ये महाबिज परिषद उत्साहात

। मुंबई । प्रतिनिधी ।

'जीएमबीएफ ग्लोबल'(गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम) द्वारे आयोजित महाबिज २०२६ ची ९वी परिषद दुबईमध्ये ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी यशस्वीरित्या साजरी झाली. यामध्ये ३० हून अधिक देशांचे ८०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि सीमापार व्यापारासाठी जागतिक केंद्र म्हणून दुबईची वाढती भूमिका स्पष्ट झाली. मराठी उद्योजकांनी आखाती देशांमध्ये आणि अन्य देशांमध्ये निर्माण केलेला उद्योग वाढीसंबंधीचा हा दुवा गेली सतरा अठरा वर्षापासून अधोरेखित होत आहे.

दोन दिवसीय कार्यक्रम ३१ जानेवारी रोजी अल हबतूर पोलो क्लबमध्ये सुरू झाला आणि १ फेब्रुवारी रोजी अटलांटिस, द पाम येथे पार पडला. यामध्ये भारत, यूएई, जीसीसी, मेना प्रदेश, आफ्रिका, युरोप, ऑस्ट्रेलिया, रोमानिया आणि दक्षिण-पूर्व आशिया येथील उद्योजक, एमएसएमई, गुंतवणूकदार, धोरणकर्ते, व्यावसायिक आणि व्यावसायिक संस्था एकत्र आल्या होत्या. या परिषदेचे लक्ष 'संपर्कांमधून करारांपर्यंत' या संकल्पनेअंतर्गत मोजता येण्याजोगे व्यावसायिक परिणाम साधण्यावर केंद्रित होते.

या कार्यक्रमात उद्घाटनपर भाषणे, मुख्य सत्रे, क्षेत्र-विशिष्ट सादरीकरणे आणि भारत-यूएई व्यापार संधी, सेपाचे फायदे, जागतिक संपत्ती निर्मिती, आफ्रिका-केंद्रित वाढीच्या धोरणांवर, व्यवसायातील तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका, नेतृत्व विकास आणि संरचित खरेदीदार-विक्रेता सहभाग मॉडेल यावर पॅनेल चर्चा यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते. ज्यात दुबईतील भारताचे महावाणिज्यदूत सतीश कुमार सिवन; पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे माजी मंत्री आणि शारजा सल्लागार परिषदेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल्ला बेलहैफ अल नुऐमी; अर्थव्यवस्था आणि पर्यटन मंत्रालयातील नवीन अर्थव्यवस्था विभागाचे संचालक तारिक अल सुवैदी; परराष्ट्र व्यापार मंत्रालयाचे उपसचिव फहाद अल गर्गावी; भारत सरकारचे संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे; आणि उद्घाटन समारंभात सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ. खोराकीवाला यांचा समावेश होता.

या परिषदेत उद्योग तज्ञ आणि व्यावसायिकांनी विशेष सत्रे आणि पॅनेल चर्चेद्वारे आपले विचार मांडले. तर विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववानांचाही सन्मान करण्यात आला. पद्मश्री सद्गुरू ब्रह्मेशानंद आचार्य स्वामी यांच्या आध्यात्मिक प्रवचनाने आणि आशीर्वादाने या मेळाव्याला एक सांस्कृतिक आयाम प्राप्त झाला.

या कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षणांमध्ये खरेदीदार-विक्रेता संवाद, जीएमबीएफ ग्लोबल बिझनेस डिरेक्टरीचे प्रकाशन आणि भविष्यातील सहयोग आणि सीमापार भागीदारीला चालना देण्यासाठीच्या नेटवर्किंग उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमात बोलताना, जीएमबीएफ ग्लोबलचे अध्यक्ष डॉ. सुनील व्ही. मांजरेकर म्हणाले की, महाबिज हे जागतिक व्यावसायिक भागधारकांमध्ये अर्थपूर्ण संवाद साधणारे आणि व्यावहारिक व्यावसायिक परिणाम सुलभ करणारे एक व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे.

---

# निवडक

## जागतिक कर्करोग दिन साजरा

**पनवेल :** नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ०१ येथे बुधवारी (दि.४) जागतिक कर्करोग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कर्करोगातून यशस्वीरीत्या बरे झालेल्या रुग्णांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मान्यवर डॉक्टरांनी कर्करोग विषयावर सखोल मार्गदर्शन करत वेळेवर तपासणी व उपचारांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमात कर्करोगातून बरे झालेल्या रुग्णांशी थेट संवाद साधून त्यांच्या संघर्षमय अनुभवांना उजाळा देण्यात आला. या अनुभवांमुळे उपस्थितांना नवी प्रेरणा व आत्मविश्वास मिळाला. दरम्यान, जागरूकतेसोबतच आशा आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.



## नागोठण्यात पोलिसांचा रूट मार्च



**नागोठणे :** रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीची सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक मतदान प्रक्रिया येत्या ७ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.४) सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजण्याच्या दरम्यान नागोठणे पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाकडून रूट मार्च घेण्यात आला. नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील नुक्कड गल्ली, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, कोळीवाडा, हुजरा मोहल्ला, के.एम.जी. विभाग, खुमाचा नाका, बाजारपेठ व परिसरात हा रूट मार्च घेण्यात आला. या रूट मार्चमध्ये दोन पोलीस अधिकारी, ४० पोलीस अंमलदार, ३० होमगार्ड यांनी सहभाग घेतला होता. हा रूट मार्च यशस्वी करण्यासाठी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी स.पो.नि सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नरेश थळकर व पोलीस कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## तळा महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा




**तळा :** द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे स्वातंत्र्य सेनानी प्रभाकर दादा देशमुख आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा व डॉ. प्र.म. जोशी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सहा महाविद्यालयातील संघांनी सहभाग घेतला. वक्तृत्व स्पर्धेमध्ये पीएनपी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक, द.ग. तटकरे महाविद्यालय माणगाव द्वितीय क्रमांक तर जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स यांना तृतीय क्रमांक मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. वादविवाद स्पर्धेसाठी पुरेसे स्पर्धक नसल्यामुळे तृतीय क्रमांकाचे एकच पारितोषिक काढण्यात आले; ते पीएनपी महाविद्यालयास देण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. संजय धनावडे, प्रभारी प्राचार्य एम.एम. जगताप महाविद्यालय महाड व प्रा. प्रसन्न म्हसाळकर वरदा तटकरे महिला महाविद्यालय धाटाव ता. रोहा यांनी काम पाहिले.

## श्रीवर्धन पोलिसांचा रूट मार्च



**श्रीवर्धन :** येत्या ७ फेब्रुवारी रोजी राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांनी आपले उमेदवार उभे केले असून सर्वत्र प्रचाराचा धुमधडाका सुरू आहे. या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार आहेत. मतदानाची व मतमोजणीची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी गुरुवारी (दि.५) श्रीवर्धन पोलिसांनी श्रीवर्धनमध्ये रूट मार्च काढला. या रूट मार्चमध्ये सशस्त्र पोलीस दल, त्याचप्रमाणे होमगार्डचे जवान सहभागी झाले होते. श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड व पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा रूट मार्च श्रीवर्धन शहरातून काढण्यात आला. श्रीवर्धन परिवहन स्थानकाजवळ असलेल्या मोकळ्या जागेत रूट मार्चनंतर काही प्रात्यक्षिके देखील घेण्यात आली.

## महागणपतीच्या दर्शनास मोठी गर्दी



**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्टी चतुर्थी निमित्ताने गुरुवारी (दि.५) गणेशभक्तांनी श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. यावेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी गणेश भक्तांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत आहे. या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात, अशी गणेश भक्तांची श्रद्धा आहे. श्रींच्या देवस्थानामुळे चिरनेर परिसरातील नागरिकांना दर महिन्याला चांगला रोजगार मिळाला असल्याची, माहिती देवस्थानचे माजी विश्वस्त संतोष ठाकूर यांनी सांगितले.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# फणसाड अभयारण्यात पक्षी गणना

- ठाणे वन्यजीव विभागाचे सहकार्य
- विविध अधिवासांतील २६ ठिकाणी दिल्या भेटी



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात पक्षी गणना ही ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांच्या वतीने एसबीआय फाऊंडेशनच्या शाश्वत सहभाग, पुनर्स्थापना आणि वन्यजीव संरक्षणाच्या माध्यमातून संवर्धन कार्यक्रमांतर्गत आणि महाराष्ट्र वन विभागाच्या ठाणे वन्यजीव विभागाच्या सहकार्याने राबविण्यात येणारी दीर्घकालीन नागरिक विज्ञानावर आधारित तीन दिवसीय पक्षी गणना फणसाड अभयारण्यात संपन्न झाली.

या उपक्रमासाठी १३ राज्ये व नेदरलँड्स येथून एकूण १३१ नोंदण्या प्राप्त झाल्या असून त्यातून महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, ओडिशा व नेदरलँड्स येथील ४० सहभागी पक्षी गणक आयटी, कला, शिक्षण, शासकीय सेवा, वैद्यकीय, कायदा आणि विद्यार्थी अशा विविध क्षेत्रांतून निवडण्यात आले होते.

१३ पथकांनी प्रत्येकात ३ पक्षी निरीक्षक, १ स्वयंसेवक व १ वनरक्षक, फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या आत व आसपासची विविध अधिवासांतील २६ ठिकाणी भेट देऊन लाइन ट्रान्सेक्ट पद्धतीने जंगल, पठारे व ओढ्यांमधून चालत पक्षी गणना केली. तसेच फुलपाखरे, सस्तन प्राणी, सरपटणारे व उभयचर प्राणी यांचीही नोंद केली. यावेळी डॉ. निखिल भोपाळे व सर्वेश अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली असून, संकलित माहितीची काटेकोर पडताळणी छायाचित्रे, आवाज नोंदी व प्रश्नोत्तरांद्वारे करण्यात आली.

तीन दिवसांच्या गणनेनंतर प्राथमिक निष्कर्षानुसार हिवाळी गणनेत ५५ कुळांमधील १५९ पक्षी प्रजाती, ६ कुळांमधील ४१ फुलपाखरांच्या प्रजाती, १३ कुळांमधील २१ सस्तन प्राणी, ९ कुळांमधील २१ सरपटणारे प्राणी, ११ साप व १० सरडे, ५ कुळांमधील ८ उभयचर प्रजाती नोंदविण्यात आल्या; यामध्ये २ निकट असुरक्षित २ नजिकच्या काळात धोक्यात येऊ शकणारी प्रजाती, २६ अनुसूची-१ व १३१ अनुसूची-II प्रजाती, १३ भारतातील स्थानिक व ७ पश्चिम घाटातील स्थानिक पक्षी, ड्रॉन्गोच्या सर्व ६ प्रजाती, ४ पैकी ३ नाइटजार, फुलपिकरच्या सर्व ३ प्रजाती तसेच श्रीलंका फ्रॉगमाउथ, बार-विंग्ड फ्लायकॅचर-श्राईक, ब्ल्यू-थ्रोटेड फ्लायकॅचर व मॉटल्ड वुड-आउल यांसारख्या विशेष पक्ष्यांचा समावेश असून संपूर्ण उपक्रमादरम्यान एकूण २००४ नोंदी करण्यात आल्या; हा दीर्घकालीन उपक्रम फणसाड वन्यजीव अभयारण्यातील महत्त्वपूर्ण अधिवासांच्या संवर्धन व जनजागृतीसाठी मोलाची भूमिका बजावणार आहे.

यावेळी उपवनसंरक्षक वन्यजीव ठाणे राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक, फणसाड वन्यजीव अभयारण्य मनोहर दिवेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी मुरुड फणसाड-नितीन ढगे, ३६ पक्षी निरीक्षक, ग्रीन वर्क्स ट्रस्टचे १८ स्वयंसेवक आणि फणसाड वन्यजीव अभयारण्याचे १८ वन कर्मचारी सहभागी झाले होते.

# निवडक



## कुष्ठरोग जनजागृती रॅलीचे आयोजन

**अलिबाग** : सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) रायगडअलिबाग यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून (दि.५) फेब्रुवारी रोजी कुष्ठरोग जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये उज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान व इतर सामाजिक संस्था यांच्या सहयोगाने तसेच कर्मचारी व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. प्राची नेहुलकर, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हूलवान, जन शिक्षण संस्थान अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, जन शिक्षण संस्थान संचालक डॉ. विजय कोकणे, अवैद्यकीय अधिकारी भगवान जाधव, विकास पाटील, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन अध्यक्ष तुषार थळे यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, नर्सिंग स्टाफ व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. तसेच उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला चंदनशिव या जनजागृती रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. सदर जनजागृती रॅली सिव्हिल हॉस्पिटल, अलिबाग येथून सुरू करण्यात आली. रॅलीदरम्यान नागरिकांना कुष्ठरोगाबाबत जनजागृती, गैरसमज दूर करणे, वेळेवर तपासणी व उपचाराचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. नागरिकांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या जनजागृती रॅलीच्या माध्यमातून समाजात कुष्ठरोगाबाबत सकारात्मक संदेश पोहोचविण्यात यश आले.



## विंधणे कातकरीवाडीत आरोग्याची ज्योत

**उरण** : वनवासी कल्याण आश्रम उरण व डिव्हाईन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील विंधणे कातकरीवाडी येथे (दि.३) फेब्रुवारी रोजी सिकलसेल ॲनिमिया निदान व सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दुर्गम आदिवासी भागात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात रक्ताशी संबंधित गंभीर आजार असलेल्या सिकलसेल ॲनिमियाच्या निदानासाठी लागणाऱ्या महागड्या तपासण्या मोफत करण्यात आल्या. या उपक्रमासाठी वनवासी कल्याण आश्रम उरण, डिव्हाईन फाऊंडेशन, ग्रामीण रुग्णालय उरण तसेच एव्हलिन हेल्थकेअर, मुंबई यांनी संयुक्त सहकार्य केले. याप्रसंगी सुमित जगदाळे यांनी उपस्थित ग्रामस्थांना सिकलसेल ॲनिमिया या आजाराविषयी सविस्तर माहिती दिली. या आजाराचे शरीरावर होणारे परिणाम, वेळीच निदानाचे महत्त्व आणि आवश्यक उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. विंधणे, कंठवली व कातकरीवाडी परिसरातील एकूण १०२ रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. एम.जी. एम. हॉस्पिटल समूहातर्फे तज्ज्ञ डॉ. सुरज सांगळे, डॉ. रूपाली जगदाळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच ग्रामीण रुग्णालय उरण येथील विशाल पाटील, महादेव पवार व लॅब टेक्निशियन यांच्या सहकार्याने रुग्णांच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या.



## हुतात्मा हिराजी पाटील स्मारकाची पाहणी

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये मानिवली, नेरळ आणि पिंपळोली ग्रामपंचायत यशस्वी ठरल्या आहेत. मानिवली ग्रुपग्रामपंचायत कार्यालयाला राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट दिली. हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे जाऊन हुतात्मा हिराजी पाटील यांना अभिवादन त्यांनी केले. तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील ग्रुप ग्रामपंचायत मानिवली, ग्रुप ग्रामपंचायत पिंपळोली व ग्रामपंचायत नेरळ या मानांकित ठरल्या आहेत. यातील हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानिवली गावी भोसले यांनी भेट दिली. ग्रुप ग्रामपंचायत मानिवली येथे भेटी दरम्यान त्यांनी हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून स्मारकाची पाहणी केली. त्यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची पाहणी केली. ग्रामपंचायतीचा विविध योजनाचा आढावा घेऊन त्यानुसार या बाबत मार्गदर्शन केले. तसेच अंगणवाडी केंद्र मानिवली येथे पाहणी, राजिप शाळा मानिवली येथे पाहणी केली. यावेळी सौर ऊर्जा प्रकल्प यांचे कौतुक केले. महाराष्ट्र शासनाच्या डिजिटल क्लास रूम याची पाहणी केली. या दौऱ्यात त्यांच्या समवेत उपमुख्य कार्यकारी (ग्रा.पं.) विशाल तनपुरे, पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील, पंचायत समिती विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) उज्वला भोसले हे होते. प्रशासक संजय चव्हाण आणि ग्रामपंचायत अधिकारी पांडुरंग म्हसे यांनी स्वागत केले.

# उरण पोलिसांचे संचलन



। उरण । प्रतिनिधी ।

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने उरण पोलीस ठाणे जासई, चिरनेर, कोप्रोली व चांणजे गावात संचलन केले. संचलनाचा उद्देश शांतता राखणे आणि मतदारांना निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन करणे हा होता. संचलन जासई पोलीस चौकी येथून सुरू होऊन, जासई, चिरनेर, कोप्रोली व चांणजे गावातून फिरून उरण एसटी स्टँड चारफाटा येथे समाप्त झाला. संचलनामध्ये उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राहूल काटवाणी, ०७ सपोनि/ पोउपनिरी, १५ पोलीस अंमलदार, RCP चे ०१ अधिकारी व १९ अंमलदार व QRT चे १० अंमलदारांनी सहभाग घेतला होता. पोलिसांनी निवडणुकी सहभागी होण्याचे व शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.



मुरूड राजपूरी येथील सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला व लगतचे राजपूरी गाव येथील नव्याने बनवण्यात आलेली जेट्टी पर्यटकांना आकर्षित करते. राजपूरी टेकडीवरून काढलेले मनमोहक चित्र. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# पनवेल शहराच्या वाहतुकीत बदल

। पनवेल । प्रतिनिधी ।

राजिप व पंचायत समिती सार्वजनिक निवडणूक २०२० या कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निवडणूक प्रशासन आवश्यक तयारीला सुरुवात केली आहे. मतमोजणीसाठी विठोबा खंडप्पा हायस्कूल, पनवेल हे केंद्र निश्चित करण्यात आले आहे. निवडणुकीअंतर्गत पनवेल तालुक्यात ८ जिप गट, १६ पंचायत समिती गणांसाठी मतदान होणार आहे. ६, ७ आणि १९ फेब्रुवारी रोजी पनवेलमधील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

६ फेब्रुवारी रोजी व्ही. के. हायस्कूल परिसरात एकूण ३७ बसेस, २९ मिनी बसेस, २१ इको कार व ४४ इर्टिगा कार नेमण्यात येणार आहेत. ७ फेब्रुवारी रोजी मतदान पेट्या याच ठिकाणी स्ट्रॉंगरूममध्ये ठेवण्यात येणार असल्याने परिसरात वाहनांची ये-जा होणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी दुप-ारी १ वाजल्यापासून ते ७ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत अमरधाम स्मशानभूमी ते व्ही. के. हायस्कूल-वडाळे तलाव विसर्जन घाट मार्ग. वडाळे तलाव बिट चौकीकडून व्ही. के. कडे ये-जा करणारा रस्ता. नवीन पनवेल सिग्नलकडून व्ही. के. कडे ये-जा करणारा रस्ता आणि नवीन पनवेल सिग्नलकडून अमरधामकडे जाणारा रस्ता या मार्गावर बंदी आहे. ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी प्रक्रियेच्या दिवशी सकाळी ५ ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अमरधाम ते व्ही. के. हायस्कूल वडाळे तलाव विसर्जन घाट मार्ग, नवीन पनवेल सिग्नलकडून व्ही, के, कडे ये-जा करणारा रस्ता बंद ठेवण्यात येणार असल्याचे वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी केले आहे.

# श्रीवर्धनमध्ये लवकरच एक दिशा मार्ग

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन शहरातील वाढते पर्यटन या अनुषंगाने अरूंद रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी, या समस्येवर लवकरच तोडगा निघत असुन एक दिशा मार्गाचा (वन-वे) अवलंब करण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, भगवान महावीर मार्ग, जुने बसस्थानक तसेच टिळक रस्ता या सतत रहदारीच्या परंतु अरूंद रस्त्यांवर वाहतूक कोंडी समस्येने स्थानिक तसेच पर्यटक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

त्यातही शालेय सहली आणि खासगी बसेस शहरात आल्यानंतर होणारी वाहतूक कोंडी ही नित्याचीच झाली आहे. अनेकवेळा वाहतूक कोंडीचे पर्यावसन वादावादी होताना दिसते.

या बाबतीत श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी वाहतूक कोंडी समस्येवर तोडगा काढला असून शहरात लवकरच एक दिशा मार्गाचा अवलंब करण्यात येणार आहे, असे सांगितले. शहरात एसटी बस ज्या मार्गावरून गावात फेरी घेत गावातून मार्गस्थ होते तोच मार्ग वन-वे करीता ठेवण्यात येणार आहे, असे सांगितले.

> **श्रीवर्धन गावात येणारी वाहने ही छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भगवान महावीर मार्ग, जुने बसस्थानक, प्रभू आळी मार्गे गावात प्रवेश करतील व गावातून बाहेर जाणारी वाहने ही टिळक रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने मार्गस्थ होतील.या बाबतीत सर्वांचे सहकार्य लाभले तर वाहतूक कोंडी समस्या निर्माण होणार नाही.**
> **- सुरेंद्र गरड.पोलीस निरीक्षक श्रीवर्धन पोलीस ठाणे**

## बिरमोळेत आरोग्य शिबीर

**पनवेल** : बिरमोळे मेडिकल फाऊंडेशन व सिटिझन्स युनिटी फोरम (कफ) या सेवाभावी सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवार ८ फेब्रुवारी रोजी कफनगर पनवेल येथील बिरमोळे रुग्णालयात अत्यल्प मूल्य आकारून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात क्ष-किरण तपासणी, हृदय स्पंदन आलेख, रक्ताच्या विविध चाचण्या, दन्त चिकित्सा, नाक, कान व घसा तपासणी, अस्थिघनता चाचणी, दमा आजार विषयीची तपासणी इत्यादी चाचण्या करण्यात येणार आहेत.

# उरण चारफाटा सर्कलला बॅनर्सचा विळखा

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहराच्या प्रवेशद्वारावर असलेल्या उरण चारफाटा सर्कलवर मोठमोठे बॅनर लावून प्रशासन थेट अपघातांना निमंत्रण देत आहे, असा संतप्त आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

उरण शहरात प्रवेश करताना होणारी सततची वाहतूक कोंडी कमी व्हावी यासाठी चारफाटा येथे सर्कल उभारून हायमास्ट दिवा बसवण्यात आला. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती सुधारण्याऐवजी वाहतूक कोंडी अधिकच गंभीर होत असल्याचे चित्र आहे. या मार्गावर अनधिकृत फेरीवाले, रविवारचा आठवडा बाजार असून, याबाबत शासकीय यंत्रणा आर्थिक साटेलोटामुळे मौन बाळगून असल्याचा आरोप होत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बेकायदेशीरपणे उभी राहणारी छोटी-मोठी वाहने वाहतुकीचा पूर्ण बोजवारा उडवत आहेत. जर भविष्यात येथे कोणताही गंभीर अपघात घडला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शासकीय यंत्रणांवरच राहील, असा स्पष्ट इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# जलसंजीवनी अभियान अंतर्गत गटाची नोंदणी



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात जलसंजीवनी अभियान अंतर्गत मुंबई येथील युनायटेड वे यांच्याकडून ग्रामीण भागात सिंचन क्षेत्रामध्ये काम करीत आहेत. या संस्थेच्या बरोबर राज्याचा कृषी विभाग काम करीत असून या संस्थांच्या माध्यमातून आत्मा अंतर्गत शेतकऱ्या गटांची नोंदणी करून घेण्यात आली.

युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारे जल संजीवनी प्रकल्प कर्जत अंतर्गत महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आत्मा अंतर्गत महिला शेतकरी गटाची यशस्वी नोंदणी केली जात आहे. शासनाच्या कृषी विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या मार्गदर्शनाखाली खांडस ग्रामपंचायतीमध्ये जल संजीवनी महिला शेतकरी गट स्थापन करण्यासाठी शेतकरी जमले होते. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गटाची आत्मा अंतर्गत यशस्वीरीत्या नोंदणी केली आहे. महिला शेतकऱ्यांना संघटित करून त्यांना आधुनिक तंत्रज्ञान, हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी हा घेण्यात आला आहे. यासाठी शेतकरी नोंदणी करण्यात आली. त्यात रोपवाटिका, शेळीपालन, प्रक्रिया उद्योग, गांडूळ खत निर्मिती, मशरूम उत्पादन यांच्यासाठी ही शेतकरी नोंदणी कार्यक्रम राबविला जात आहे. अशा शेतकरी गटासाठी प्रशिक्षण आत्मा यंत्रणेमार्फत या गटाला प्रगत शेती तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि काढणीनंतर व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांकडून प्रशिक्षण दिले जात आहे. शासकीय लाभ अंतर्गत नोंदणीकृत गटाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ, प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. सदस्य नोंदणी आत्माप्रकल्प संचालक वंदना शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रेशमा मते, दिनेश कोळी यांचा सहभाग आहे.

## संगिता औताडे यांचे राज्यस्तरावर यश



। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने राज्यभरातील शिक्षक, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध ४३ प्रकारच्या स्पर्धांमध्ये रायगड जिल्ह्याने आपली मोहोर उमटवली आहे. सुधागड तालुक्यातील रजिप शाळा, दिघेवाडी येथे कार्यरत असलेल्या औताडे यांनी स्पर्धांमध्ये अष्टपैलू कामगिरी करत राज्यस्तरापर्यंत यश संपादन केले आहे. औताडे यांनी राज्यस्तरीय 'शब्दकोडे निर्मिती' स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रात चतुर्थ क्रमांक पटकावला. ही स्पर्धा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे येथे पार पडली होती. त्यांनी मुंबई विभागात शब्दकोडे निर्मितीमध्ये प्रथम पटकावला होता. तालुकास्तरावर सुडोकू, शब्दकोडे निर्मिती स्पर्धांत त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला होता. त्यांना सुधागडचे गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, नवनाथ साबळे, अशोक तुरे, केंद्र प्रमुख शेरमकर, शोभा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

पवित्र भूमीत त्यांना अखेरचा निरोप | स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित

# हरिहरेश्वर येथे अजितदादांच्या अस्थींचे विसर्जन



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या अस्थींचे दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वर या पवित्र तीर्थक्षेत्री अत्यंत श्रद्धेने आणि विधिवत विसर्जन करण्यात आले. या भावूक प्रसंगी संपूर्ण परिसर शोकमग्न झाला होता.

अस्थी विसर्जन सोहळ्यावेळी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आ. अदिती तटकरे, माजी आ. अनिकेत तटकरे यांच्यासह निकटवर्तीय सहकारी, राष्ट्रवादी पक्षाचे असंख्य कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैदिक मंत्रोच्चारात हा विधी पार पडत असताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तर मनात असह्य वेदना दाटून आल्या होत्या. दादांसोबत घालवलेले क्षण, त्यांचे मार्गदर्शन, आपुलकीचा स्वभाव आणि विकासाबाबतची तळमळ यांची आठवण काढताना अनेकजण भावूक झाले. हरिहरेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी अजितदादांनी सातत्याने लक्ष दिले होते. या तीर्थक्षेत्राच्या पायाभूत सुविधा, पर्यटन विकास आणि स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी वेळोवेळी आस्थेने विचारणा केली असल्याचे अनिकेत तटकरे यांनी भावूक शब्दांत सांगितले.

हरिहरेश्वरच्या विकासासाठी दादांनी मनापासून प्रयत्न केले, त्याच पवित्र भूमीत त्यांना अखेरचा निरोप द्यावा लागत आहे, ही भावना शब्दांत व्यक्त करता येणार नाही, असे सांगताना अनेकांचे डोळे पाणावले होते.

यावेळी उपस्थितांनी दादांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. दादा आज शारीरिक रूपाने आपल्यात नसले, तरी त्यांचे विचार, कार्य आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी सदैव आमच्या मनात जिवंत राहील, अशा भावना सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात आल्या.

### मंदिर परिसरात मौन

अस्थीविसर्जनानंतर हरिहरेश्वरच्या मंदिर परिसरात काही काळ मौन पाळून दिवंगत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगाने संपूर्ण श्रीवर्धन तालुका आणि परिसरात शोककळा पसरली होती. दादांची उणीव कधीही न भरून निघणारी असल्याची भावना यावेळी नागरिक व्यक्त करत होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- गावरान कोंबडीची (सोनाली) पिल्ले मिळतील. मु.पो.आक्षी, अलिबाग, संपर्क : ९२७०५९०६२३
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रोहा-पनवेल प्रवाशांना डिजिटल दिलासा

## रोहा रेल्वे प्रवासी समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; हजारो चाकरमान्यांचा वेळ वाचणार



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रोहा ते पनवेल दरम्यान दररोज प्रवास करणाऱ्या हजारो चाकरमान्यांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असून, आता रेल वन मोबाईल ॲपवरून रेल्वे पास काढण्याची तसेच नूतनीकरणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. रोहा रेल्वे प्रवासी समितीने केलेल्या सातत्यपूर्ण व ठाम पाठपुराव्यामुळे अखेर हा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागला आहे.

रोहा रेल्वे स्थानक हे मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या सीमारेषेवर असल्याने तांत्रिक कारणांमुळे डिजिटल पास प्रणालीत रोहा-पनवेल मार्गाचा समावेश होत नव्हता. परिणामी, रेल वन ॲपमध्ये हा मार्ग न दिसणे, पास काढताना पेमेंट अडकणे, नूतनीकरण होत नसणे अशा अनेक अडचणी प्रवाशांना भेडसावत होत्या. त्यामुळे नोकरी करणारे कामगार, विद्यार्थी आणि नियमित प्रवाशांना तासन्तास तिकीट खिडकीवर रांगेत उभे राहावे लागत होते. यामुळे वेळ, श्रम आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते.

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वेच्या वरिष्ठ व्यवस्थापकांची वारंवार भेट घेतली. डिजिटल इंडियाच्या युगात ग्रामीण आणि नगरातील प्रवाशांना तांत्रिक कारणांमुळे सुविधांपासून वंचित ठेवणे अन्यायकारक आहे, असा ठोस मुद्दा मांडत समितीने लेखी पत्रव्यवहार, तांत्रिक त्रुटींचे पुरावे आणि प्रवाशांच्या तक्रारी रेल्वे प्रशासनासमोर सादर केल्या.

या पाठपुराव्याची दखल घेत रेल्वे प्रशासनाने अखेर आवश्यक तांत्रिक सुधारणा करत रेल वन ॲपवर रोहा-पनवेल मार्गासाठी पास सुविधा कार्यान्वित केली. यामुळे वेळेची मोठी बचत तिकीट खिडकीवरील लांब रांगा टळणार, कॅशलेस व्यवहार ऑनलाइन पेमेंटमुळे सुट्या पैशांचा त्रास संपणार, घरबसल्या सुविधा पास काढणे व नूतनीकरण मोबाईलवरून शक्य सुरक्षितता भौतिक पास हरवण्याची भीती नाही हे प्रवाशांना होणारे महत्वाचे फायदे आहेत.

रोहा रेल्वे प्रवासी समितीचे अध्यक्ष फैसल अधिकारी आणि गणेश मासक यांनी समाधान व्यक्त करत सांगितले की, प्रवाशांची गैरसोय दूर करणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट होते. रेल्वे प्रशासनाने आमच्या मागणीची सकारात्मक दखल घेत तांत्रिक अडथळे दूर केले, ही बाब सर्व प्रवाशांसाठी अत्यंत आनंदाची आणि दिलासादायक आहे.

# बालगोपाळांसोबत महेंद्र घरत यांचा संवाद

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

अलिबाग-सातिर्जे येथे महेंद्र घरत महाविकास आघाडीच्या प्रचाराला गेले होते. त्यावेळी त्यांनी दिवंगत मधुकर ठाकूर यांनी गरिबांसाठी उभारलेल्या शिक्षण संकुलाची पाहणी केली आणि मनापासून आनंद व्यक्त केला.

त्यांनी किहीम आदिवासी वाडीला भेट दिली. गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तेथे स्वागताला आदिवासी महिला, बालदोस्त होते. त्यांनी महेंद्र घरत, हर्षवर्धन सकपाळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मोठ्या प्रमाणात जमलेल्या आदिवासी बालदोस्तांना पाहून महेंद्र घरत यांना प्रचंड आनंद झाला. महेंद्र घरत यांच्यात आजही बालपण दडले आहे. त्यांनी तातडीने बालदोस्तांसोबत संवाद साधला आणि चॉकलेट देऊन त्यांचा आनंद द्विगुणित केला. यावेळी मिलिंद पाडगावकर, श्रुती म्हात्रे आदी महाविकास आघाडीचे मान्यवर उपस्थित होते.

### जाहिर नोटीस

माझ्या अशिलाच्या वृत्तीने तमाम जनतेस या नोटीसीद्वारे असे सूचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी १. श्रीमती. अहिल्या दत्ताराम तटकरे, २. श्री. सुधीर दत्ताराम तटकरे, ३. श्रीमती. भरती प्रदीप वझे, ४. सौ. शुभांगी अशोक पवार यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीतील जमीन गट नं. ४९/२, क्षेत्रफळ १६ गुंठे, गाव - बारशीव, ता. मुरुड, जि. रायगड, महाराष्ट्र ४०२ ४०६. येथील जमीन सर्व हक्क, अधिकार व फायदा सहित कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवत आहोत.

वरील १. श्रीमती. अहिल्या दत्ताराम तटकरे, २. श्रीमती. भरती प्रदीप वझे, ३. सौ. शुभांगी अशोक पवार यांनी त्यांचे सर्व अधिकार, हक्क हे श्री. सुधीर दत्ताराम तटकरे यांस कायमस्वरुपी कुलमुखत्यार पत्राने दिले आहेत.

कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी बक्षीस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, लोन, बुकिंग किंवा इतर जर असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यांपासून १४ दिवसांच्या आत दावेशी संबंधित असलेल्या दस्तऐवजांची प्रमाणित केलेल्या प्रतीसहित खालील सही केले यांच्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधांवा, अन्यथा विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कुठलेही प्रकारचे येणाऱ्या हरकती/तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मालमत्तेचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्वे नं | क्षेत्र हेआरपी |
|---|---|---|
| बार्शीव | ४९/२ | ३२ गुंठे पैकी १६ गुंठे |

सही/-
**ॲड. शीतल म. पाटील**
बीएएल.एल.बी.
प्लॉट नं. १३६/बी, तळमजला
चांगदेव स्मृती, सेक्टर १९,
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
दि. ०५/०२/२०२६
मो. ०७६६६९६५८८८

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विमान मालक श्री.तरंग प्रफुल्ल विजयकर, यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मान तर्फे झिराड, ता.अलिबाग | ५७/१/अ/१ | ९२.७०.०० | ९२७.०० |

वर नमुद मिळकतीपैंकी क्षेत्र २८.१५.०० चौ.मी आकार २८१.५० रू. पै या क्षेत्रापैंकी श्री.तरंग प्रफुल्ल विजयकर यांच्या हिश्श्यांचे अविभाज्य क्षेत्र हे या नोटीशीचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक- ०६/०२/२०२६

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागांव ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे.) |
|---|---|---|---|
| नागांव ता. अलिबाग | १९०० | ०-३८-५० पो.ख. ०-०१-०० एकुण ०-३९-५० | ५.३१ |

**टीप :** वरील नमुद मिळकतीपैकी चेतना हितेश विरा, हितेश कल्याणजी विरा यांच्या मालकीची ०-२३-४० हे. आर. व पो. ख. ०-०१-०० हे. आर. एकुण ०-२४-४० हे. आर., आकार ३.२३ रू. पै. ही मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर बिनशेती मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्यावर ती बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

अलिबाग,
तारीख : ०५/०२/२०२६

**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी. ए. एल. एल. बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खांडस, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक मनोहर नारायण पाटील यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १७९ | १८ | ०-१८-०० | ०-१६ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०६/०१/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

### जाहीर नोटीस

मौजे नागझरी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमपान क्र. व उपविभाग ११४ ही मिळकत श्री. विलास नरेंद्र कदम वगैरे, रा. फ्लॅट नं. २१०५, सेवेन हील को.ऑप. हौ.सोसा., टेंभी पाडा रोड, शिवाजी नगर, भांडूप वेस्ट, मुंबई ४०००७८ यांच्या खुद्द मालकीची व ताबेकब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीचे विलास नरेंद्र कदम वगैरे कायदेशीर मालक असल्याने सदर मिळकतीच्या खरेदी विक्री व्यवहाराचा निर्णय घेण्याचा अधिकार त्यांस आहे असे सदर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे. खुद्द मालकांव्यतीरिक्त सदर मिळकतीशी इतर कोणत्याही इसमाचा संबंध नाही. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| नागझरी | ११४ | ०-५४-२० | ०-००-६० | ५.७० |

वरील वर्णनाची सामाईक मिळकत मौजे नागझरी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन व उपविभाग क्र.११४ ही मिळकत आमच्या अशिलांनी विकण्याचे ठरविले आहे. तरी वर नमूद सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजाविरहित असून तिचे टायटल मार्केटेबल व क्लिअर आहे अशी खात्री मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिली आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणत्याही इसमाचा, संस्था, साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारसहक्क, पोटगीदान, गहाण, तारण, बोजा भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर करावी तसेच उक्त मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असून तिचे टायटल मार्केटेबल व क्लिअर आहे असे समजून आम्ही त्याबाबत टायटल क्लिअर असल्याचा दाखला देणार आहोत व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. सदर मिळकतीचे मालक विलास कदम वगैरे सदर मिळकतीचा व्यवहार अन्य खरेदीदारासोबतही करण्यास कोणाचेही बांधील राहणार नाहीत. अशा प्रकारचा कोणताही हक्क असल्यास तर तो जाणीवपूर्वक विद्यमान मालकीच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ०६/०२/२०२६

**ॲड. जान्हवी ऋषिकांत कार्लेकर**
रा.मु.पो.कुरूळ, आगर आळी,
बापदेव नाका, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९६७३७९५९१०/९०६७५१८५५५

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल ता, अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.धनेश कृष्णकांत कापडिया रा.सूर्या अपार्टमेंट, रुम नं. अे/२०३ आनंदनगर, उरण, ता.उरण, जि.रायगड व श्री.नरेश कृष्णकांत कापडिया रा.३८६०, उरण-करंजा रोड, नगेशहा बाबा दर्गा समोर, उरण, ता. उरण, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | ३४७ | ०-१६-७० पो.ख.०-०१-५० एकूण ०-१८-२० | २.८१ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०२/२०२६

सही/-
**श्री. शेखर विष्णू मगर**
पत्ता: दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक संतोषकुमार हौशिलाप्रसाद विश्वकर्मा यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २३/२ | ००-४८-१०हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी विश्वकर्मा यांचे मालकीचे ००-३०-१० हे.आर. पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | २-९४ |
| २४/१ | ००-३१-२० | ०-९७ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६ फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक राजेंद्र दामोदर शेवडे यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग | ८४६ | ०-०२-६० जिरायत ०-००-२० पो.ख. ०-०२-८० एकुण | ०.३९ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक ०५/०२/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु. पो. नागांव,ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
### जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

**अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२६ दि.**

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १५६१अ/०४११३ | व्यायाम शाळेच्या बाजूला, अलिबाग | पहिला मजला, ए विंग सदनिका क्र.१०१ | सबीहा आबीद शेख व आबीद अब्दुल रहेमान शेख | इस्राईल इसा बागवान |
| २ | २ | २८/अ/०५०७५ | श्रीबाग २, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.३०३ | महावीर लाईफस्पेसेस तर्फे पार्टनर संजय प्रेमचंद गोखले, प्रविण पारसमल गोखरू व राहुल नरेंद्र जैन | विलास सुरेश कोकणे, प्राजक्ता विलास कोकणे व गौरव विलास कोकणे |
| ३ | ३ | ५५म्हाडा/०२८३८ | ५८ म्हाडा कॉलनी, अलिबाग | सदनिका क्र. त प | चंद्रकांत नारायण नर | नम्रता दिपक नर |
| ४ | २ | १२७०/०५०७३ | मारूती नाक्याजवळ, अलिबाग | चौथा मजला, निवासी सदनिका क्र.बी ४०३ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी अमित अरविंद पाटील | भावेश नारायण थळे व प्राची भावेश थळे |
| ५ | २ | १६४८/सी विंग/०१९७१ | कन्याशाळेजवळ ब्राम्हण आळी, अलिबाग | पहिला मजला, सी विंग सदनिका क्र.१०३ | मे.कळसगिरी बिल्डर्स ॲड डेव्हलपर्स तर्फे सो. श्री.प्रसाद अनंत जोग | दिलीप हरिश्चंद्र जाधव |
| ६ | २ | ५४६ब(बिल्डिंग C) B WING/०५०९९ | चेंढरे, अलिबाग | उंचावलेला पहिला मजला, बी विंग, निवासी सदनिका क्र. २०४ | शार्दुल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार प्रशांत दिनकरराव फुलगावंकर व कविता प्रशांत फुलगांवकर | सुहास वासुदेव आंबरे |
| ७ | २ | १२७०/०५०७४ | मारूती नाक्याजवळ अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. सी.२०६ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी अमित अरविंद पाटील | रितेश रमेश थळे व स्नेहा रितेश थळे |
| ८ | २ | १०७३/०५०२० | छत्रपती शिवाजी महाराज चौक अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.बी२०३ | प्रशांत मधुसूदन नाईक तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी धनंजय अनंत दळवी | राकेश श्रीधर नाईक |
| ९ | २ | १०७३/०५०३० | छत्रपती शिवाजी महाराज चौक अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.बी४०३ | प्रशांत मधुसूदन नाईक तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी धनंजय अनंत दळवी | प्रज्ञा रमेश देवरे |
| १० | २ | १५९६क/डी विंग ०१९०९ | ब्राम्हणआळी रामनाथ रोड, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. बी २१४ | मे.रसिका कंस्ट्रक्शन तर्फे पार्टनर श्री.जयंत मधुकर वाखारकर | यशवंत जानू घोसाळकर |
| ११ | २ | ११७/श्रीबाग २/०२६८९ | श्रीबाग २ अलिबाग | दुकान गाळा. ३ | भारती मधुकर पतंगे | अप्पु मुनसरीफ बागवान |
| १२ | २ | १०७३/०५०४१ | छत्रपती शिवाजी महाराज चौक, अलिबाग | सहावा मजला, निवासी सदनिका क्र.बी.६०४ | प्रशांत मधूसूदन नाईक तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी धनंजय अनंत दळवी | अमीर मधुकर ठाकूर व काजल अमीर ठाकूर |
| १३ | २ | १०३४/०५०५२ | छत्रपती शिवाजी महाराज चौक, अलिबाग | तळ मजला शॉप क्र.०१ | जोग इम्फ्रास्ट्रक्चर्स तर्फे प्रो. पा.प्रसाद अनंत जोग | अहिल्याबाई रामा फुलमाळी |
| १४ | २ | १६१९अ/5D विंग/०४६५२ | ब्राम्हणआळी, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.डी २०२ | विशाल उत्तम शाह व विज्ञा विशाल शाह | शर्मिला घनश्याम वार्डे व राजेश घनश्याम वार्डे |
| १५ | २ | १४० श्रीबाग २/०२७२० | श्रीबाग २ अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.९ | वर्षा शरदचंद्र साळवी | वंदना कृष्णाराव कदम |
| १६ | ३ | १२७०/०५०७३ | मारूती नाक्याजवळ, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.सी.२०६ | अक्षय बिल्डर्स तर्फे प्रशांत मधुसूदन नाईक व संजय ज्ञानदेव चव्हाण तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी अमित अरविंद पाटील | अमिता स्वरूप रेवाणकर व स्वरूप शशिकांत रेवाणकर |
| १७ | २ | ९१७/अ/०४९३१ | मिरची गल्ली, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.३०२ | रविकुमार लोकनाथ मेहता | सर्वेश गजानन हवालदार |
| १८ | २ | ४६९अ/००५८४ | ठिकरूळ, नाक्याजवळ अलिबाग | सदनिका क्र.१ | राजीव भार्गवराव धामणकर | न्यूराईज हेल्थकेअर एल एल पी तर्फे पार्टनर परवेज रफिक शेख व आदित्य विनायक चेवले |
| १९ | २ | ४६९ब/००५८३ | ठिकरूळ, नाक्याजवळ अलिबाग | सदनिका क्र.१ | राजीव भार्गवराव धामणकर व रिटा राजीव धामणकर | न्यूराईज हेल्थकेअर एल एल पी तर्फे पार्टनर परवेज रफिक शेख व आदित्य विनायक चेवले |
| २० | २ | ५५१/अ/०४९२३ | चेंढरे,अलिबाग | सदनिका क्र.३०२ | मे दिपिका कन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा संतोष दामोदर मोरे | प्रिया निशांत पाटील |
| २१ | २ | १६१९अ/४C/विंग/०४६४२ | ब्राम्हणआळी, अलिबाग | दुसरा मजला, सी विंग, सदनिका क्र.२०१ | मे सावित्री कंन्स्ट्रक्शन तर्फे मुकेश बी जैन तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी सुभाष जैन | अरूणा अरविंद शाह |
| २२ | २ | ३३/८/०४१५९ | भाजी मार्केटजवळ, अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.१०४ | हितेश छटवाल तर्फे कबुलीजबाबाकरीता अखत्यारी इम्तियाज जहागिर दाऊत सैय्यद जैन | सुरेश जयराम महापदी |
| २३ | २ | ४२६/००५१५ | ठिकरूळ नाक्याजवळ, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०७(१८) | प्रज्ञा शशिकांत भट | प्राजक्ता गजानन नागवेकर |
| २४ | २ | ८६४ सी विंग/०३८४१ | भाजी मार्केटजवळ अलिबाग | तिसरा मजला, सी विंग सदनिका क्र.३०२ | रमाकांत बाळकृष्ण गुर्जर | इसराईल इब्राहिल बागवान व यासमीन |
| २५ | २ | १०३० ए विंग/०१३१५ | मशिदीजवळ बाजारपेठ, अलिबाग | तळमजला, ए विंग सदनिका क्र.११ | बिधान फनिंदर शासमल | महेश श्रीवर्धन म्हात्रे |
| २६ | २ | १५७२/१८७१ | एस.टी.स्टँड राममंदिर रोड, अलिबाग | सदनिका क्र.२०१ | भालचंद्र जनार्दन टिळू | स्मिता दिलीप परळीकर |

**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

# श्रेयचोरीचे नेतृत्व चौलकरांना नको

## सुरेंद्र म्हात्रेंच्या रूपाने विकासाचा खरा चेहरा समोर





| अलिबाग | प्रतिनिधी |

सतत एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उड्या मारणारे, स्वतःच्या अधिकारक्षेत्राशी काहीही संबंध नसलेल्या कामांचे खोटे श्रेय घेणारे, तसेच गेली ४०-५० वर्षे वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना आजूबाजूची जागा विकत घेऊन जेसीबी लावून घरे पाडण्याच्या धमक्या देणारे नेतृत्व चौलकरांना नको आहे. चौलची जनता स्पष्टपणे निष्ठा, काम आणि माणुसकीच्या बाजूने उभी आहे. हजारो बेघर नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देणारे, अनेक गरजू कुटुंबांना स्वतःचे हक्काचे घर बांधून देणारे, ऐतिहासिक वारसा जपत चौलमधील मंदिरे, प्रत्येक गल्लीतील रस्ते, महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवून घरोघरी नळयोजना राबवणारे आणि कुणाच्याही अडचणीत अर्ध्या रात्री मोठ्या भावासारखे धावून जाणारे नेतृत्व म्हणजेच सुरेंद्र म्हात्रे.

पाच वर्षांपूर्वी चौलकरांनी सुरेंद्र म्हात्रे यांच्यावर विश्वास टाकून त्यांना निवडून दिले, तीच विकासाची आणि विश्वासाची परंपरा अखंड ठेवण्याचा निर्धार आज जनतेतून व्यक्त होत आहे.



सध्या काहीजण आग्राव रस्त्याचे श्रेय घेऊन मतांची मागणी करत असले, तरी हा रस्ता तसेच मतदारसंघातील विविध विकासकामे शासन दरबारी पाठपुरावा करून, लेखी प्रस्ताव व प्रत्यक्ष भेटींद्वारे मंजूर करून घेण्याचे काम सुरेंद्र म्हात्रे यांनीच केले आहे, हे वास्तव जनतेला माहीत आहे.

पाच वर्षे सत्तेच्या जवळ राहून सर्व सुविधा उपभोगणारे, बंगले बांधण्याच्या परवानग्या घेणारे आणि निवडणुकीच्या तोंडावर दुसऱ्याने टाकलेली हाडे चघळत आता टीका करणाऱ्यांनी आधी स्वतःच्या भूमिकेकडे पाहावे, असा थेट सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने आमदारकीची उमेदवारी सोडणारे कुठे आणि स्वतःच्या स्वार्थासाठी ज्या पक्षाने मोठे केले त्या पक्षाला संकटात असताना सोडून जाणारे कुठे हा फरक जनता स्पष्टपणे ओळखते.

चौलची जनता सुज्ञ आहे. निष्ठावान कोण आणि संधीसाधू कोण, हे ती चांगल्या प्रकारे जाणते. त्यामुळे कोणाच्याही भुलथापांना बळी न पडता योग्य तो निर्णय चौल जिल्हा परिषद मतदार संघातील जनता नक्कीच देईल. निवडणुकीपुरते नव्हे, तर चोवीस तास जनतेसाठी उपलब्ध असणाऱ्या, विकास आणि विश्वासाचे प्रतीक ठरलेले सुरेंद्र म्हात्रे यांना पुन्हा संधी द्यावी, असा ठाम कौल जिल्हा परिषद मतदार संघातील जनता देत आहेत.





● महाविकास आघाडीचे चौल जिल्हा परिषद गटाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे व चौल-रेवदंडा पंचायत समिती गणाचे उमेदवार राकेश म्हात्रे यांच्या प्रचारार्थ नागाव येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात प्रचाराचा नारळ वाढवून अंतिम टप्प्यातील प्रचार पार पडला.

# महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल

## शेकाप तालुका चिटणीस रवी घरत यांचा विश्वास

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचे काम हे शेतकरी कामगार पक्ष तसेच महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी केले आहे. त्यामुळे विरोधकांनी कितीही वल्गना केल्या तरी पंचायत समितीवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकेल, असा विश्वास शेतकरी कामगार पक्षाचे उरण तालुका चिटणीस रवी घरत यांनी व्यक्त केला आहे.

उरण हा शेतकरी, कष्टकरी, प्रकल्पग्रस्तांचा तालुका आहे. या तालुक्यातील जनतेच्या, प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने शेकाप रस्त्यावर उतरला आहे. येथील गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष तसेच महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी काम केले आहे. त्यामुळे विरोधकांनी कितीही वल्गना केल्या तरी उरण तालुक्यात महाविकास आघाडीतील शेकाप, काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेद्वार विजयी होऊन पुन्हा एकदा उरण पंचायत समितीवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकवतील, असा विश्वास शेकापचे उरण तालुका चिटणीस रवी घरत यांनी व्यक्त केला आहे.

# सुधागड सन्मान समितीच्या उमेदवारांचा घरोघरी प्रचार



| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू आहे. सर्वच राजकीय पक्ष व नेतेमंडळीसाठी ही निवडणूक सामाजिक राजकीयदृष्ट्या अस्तित्व व प्रतिष्ठा जपणारी बनली आहे. यावेळी जांभूळपाडा जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अत्यंत अटीतटीची व चुरशीची होताना दिसत आहे.

सुधागड सन्मान समितीच्या माध्यमातून सुधागडच्या सर्वांगीण शाश्वत विकासासाठी सुधागडातून जांभूळपाडा जिल्हा परिषदेचे उमेदवार शर्मिला शरद बोडके हे निवडणूक लढवत आहेत. तर, त्यांच्या विरोधात नीलिमा पाटील या निवडणूक लढवीत आहेत. त्यामुळे ही लढत अटीतटीची होणार आहे. तर, परळी पंचायत समिती उमेद्वार प्रणिता परदेशी या निवडणूक मैदानात ताकतीने उतरल्या आहेत. या मतदारसंघात सुधागड सन्मान समितीच्या उमेदवारांसह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरात जाऊन प्रचार केला आहे. त्यांना जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद व पाठिंबा मिळत आहे.

यावेळी बोलताना राजेश परदेशी म्हणाले की, ही निवडणूक मायबाप जनतेने पूर्णपणे हातात घेतली आहे. धनशक्ती आणि हुकूमशाहीच्या विरोधात आणि जे उमेद्वार आपल्यावर लादले गेले आहेत त्यांच्या विरोधात आम्ही लढत आहोत. आता विरोधकांना पुन्हा संधी हवी आहे. परंतु, मागील ४० वर्षांत त्यांना सुधागडचा विकास करता आला नाही. मग पुढील पाच वर्षांत हे कोणता विकास करणार? यांच्याकडे विकासाचे काय धोरण आहे, असा सवाल परदेशी यांनी उपस्थित केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, आज आम्ही गावोगावी प्रचार रॅलीचे आयोजन करत आहोत. या रॅलीत तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत सारेच चेहरे पहावयास मिळत आहेत. ही निवडणूक सर्वसामान्य जनतेची, सर्वसामान्य कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. मग ते कार्यकर्ते माझ्या पक्षातील असोत वा इतर पक्षातील असोत, ही निवडणूक आता जनतेने हातात घेतली असून येत्या ९ तारखेला या मतदारसंघात धक्कादायक निकाल लागलेला पहावयास मिळेल, असा विश्वास राजेश परदेशी यांनी व्यक्त केला.

जांभुळपाडा जिल्हा परिषद उमेद्वार शर्मिला बोडके सुधागडवासीयांना निवेदन करत म्हणाल्या की, मी कोणालाही न घाबरता निर्भीडपणे मैदानात उतरली आहे.आपल्याला कोणत्याही परिस्थितीत ताकतीने लढायचे आहे, आणि सुधागडला जिंकवायचा आहे. तसेच, या विभागातील अनेक प्रलंबित प्रश्न व समस्या मार्गी लावून जनतेला योग्य तो न्याय देणार असल्याची ग्वाही देखील उमेद्वार बोडके व परदेशी यांनी दिली आहे.



● नवेदर बेली येथे चेंढरे जिल्हा परिषद गटातील व पंचायत समिती गणातील शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्तपणे प्रचार करण्यात आला.





# पनवेलमधे टपाली मतदान पार

| पनवेल | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीसाठी टपाली मतदानास सुरुवात झाली आहे. पनवेल तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी येथील वि.खे. हायस्कूलमध्ये टपाली मतदान केंद्र उभारण्यात आले होते. यावेळी पोलीस बांधवांनी उत्स्फूर्तपणे आपला मतदानाचा हक्क बजावला. येत्या ७ तारखेला प्रत्यक्ष मतदान होणार असून, त्या दिवशी पोलीस अधिकारी व कर्मचारी मतदान केंद्रांवर बंदोबस्तासाठी तैनात राहणार आहेत.



● नागाव-खारगल्ली येथे महाविकास आघाडीचे जि.प. उमेदवार सुरेंद्र म्हात्रे व पंचायत समिती गणाचे उमेदवार राकेश म्हात्रे यांच्या प्रचारार्थ पिंट्या उर्फ अमिर ठाकूर यांनी हजेरी लावली.



# महाविकास आघाडीच्या बाईक रॅलीला प्रतिसाद

| पनवेल | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या महाविकास आघाडीचे नेरे जिल्हा परिषद गटाचे उमेद्वार मारुती भस्मा आणि आदई पंचायत समिती गणाचे उमेद्वार विलास फडके यांच्या बाईक रॅलीचे आयोजन गुरूवारी (दि.५) करण्यात आले होते. या रॅलीला उदंड प्रतिसाद मिळाला. या बाईक रॅलीत मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, नेते सहभागी झाले होते. यावेळी माजी आ. बाळाराम पाटील, जिल्हाचिटणीस प्रकाश म्हात्रे, नामदेव फडके, ठाकरे गटाचे विश्वास पेटकर यांच्यासह अनेकांनी सहभाग घेतला.

नेवाळी येथून सुरू झालेली महाविकास आघाडीची ही रॅली पुढे आदई, केवाळे, भोकरपाडा, चिपळे, बोनशेत, कोप्रोली, विहीघर या ठिकाणी मार्गस्थ झाली. महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन या बाईक रॅलीत करण्यात आले. विलास फडके आणि मारुती भस्मा हे निवडणूक रिंगणात उतरले असून त्यांना सकारात्मक वातावरण असल्याचे चित्र दिसत आहे. रॅली दरम्यान घोषणाबाजी करत नागरिकांशी थेट संवाद साधत शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. या रॅलीला तरुण वर्गासह जेष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होतील असे माजी आ. बाळाराम पाटील यांनी सांगितले.

# जासईत महाआघाडीच्या उमेदवारांचे पारडे जड

| उरण | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, जासई जिल्हा परिषद गटाचे महाविकास आघाडीचे उमेद्वार डॉ. मनीष पाटील व पंचायत समिती गणातील उमेदवार निर्मला नरेश घरत यांचा प्रचाराचा झंझावात सुरू आहे. त्याच्यांसह कार्यकर्ते घर टू घर जाऊन प्रचार पत्रकाचे वाटप करत आहेत. यादरम्यान, प्रत्येक गावागावात उमेदवारांचे जल्लोषात स्वागत होत आहे. यावेळी जासई जिल्हा परिषद गटात व चिर्ले पंचायत समिती गणात महाविकास आघाडीच्या उमेद्वारांनी प्रचारात निर्णायक आघाडी घेतली आहे.



दरम्यान, तालुक्यातील सोनारी, करळ, सावरखार, धुतुम, जासईसह अनेक गावांध्ये जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या दोन्ही उमेद्वारांच्या प्रचाराला सुरुवात झाली. यावेळी उमेद्वारांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी नागरिकांबरोबर संवाद साधून, हाताचा पंजा व खटारा चिन्हासमोरील बटन दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. प्रचारात महिला, तरुण मंडळी, ज्येष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. प्रचारात डॉ. मनीष पाटील, निर्मला घरत व प्रियांका मढवी यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. यावेळी माजी आ. मनोहर भोईर, काँग्रेसचे महेंद्र घरत, विनोद पाटील, प्रेमनाथ ठाकूर, संतोष घरत, जयराम पाटील, सुरेश डाकी, निसर्गा डाकी, मंगेश म्हात्रे, दिपक ठाकूर, रोहिदास पाटील, मेघश्याम कडू, दिनेश कडू, दिनेश पाटील, नारायण तांडेल, किशोर कडू, रमाकांत कडू, दत्ता कडू, कमलाकर पाटील, किशोर कडू, शेखर कडू, अविनाश कडू, प्रवीण कडू, सुनील कडू, विराज कडू, सूचित कडू, प्रमोद पाटील, विनोद पाटील, तुकाराम कडू, अशोक कडू, दिनेश तांडेल, मुन्ना तांडेल, केशव तांडेल, प्रकाश तांडेल, विश्वास तांडेल, प्रतीक कडू, भूषण कडू, संदीप तांडेल, दिनेश ठाकूर, विद्याधर ठाकूर, नरेश तांडेल, डि. के.कडू, सुजाता कडू, शंकर तांडेल, मंगेश तांडेल, अंकुश तांडेल, रामनाथ पंडित, के. बी. पाटील, नामदेव पाटील, स्वाती मुंबईकर, सुरेश कडू, विनोद पाटील, प्रकाश मुंबईकर, जगदीश पाटील, रवींद्र पाटील, परेश पाटील, शरद पालकर, महेंद्र मुंबईकर, अरविंद पाटील आदींसह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाविकास आघाडीच्या प्रचाराचा झंझावात

| पनवेल | प्रतिनिधी |

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वावंजे जिल्हा परिषद गटातील महाविकास आघाडीचे उमेद्वार लता डी.बी म्हात्रे, पंचायत समिती गणाचे उमेदवार पराग भोपी व



बाळू वारा, तसेच आदई पंचायत समिती गणाचे उमेदवार विलास फडके यांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, विश्वास पेटकर, प्रमोद पाटील, जीवन पाटील, रामदास गोंधळी, नंदू म्हात्रे, परशुराम गायकर, बबन फडके आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पळस्पेत महाआघाडीच्या उमेदवारांचे जल्लोषात स्वागत




| चिरनेर | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात महाविकास आघाडीचे पळस्पे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार अस्मिता ढवळे-पाटील व कोन पंचायत समिती गणातील उमेदवार शर्मिला माळी यांचा प्रचाराचा झंझावात सुरू आहे. त्यांच्यासह कार्यकर्ते घराघरात जाऊन प्रचार पत्रकाचे वाटप करत आहेत. प्रत्येक गावागावात उमेदवारांचे जल्लोषात स्वागत होत आहे.

या मतदार संघातील मतदार हे जागृत मतदार आहेत. त्यामुळे पळस्पे जिल्हा परिषद गटात व कोन पंचायत समिती गणात महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी प्रचारात निर्णायक आघाडी घेतली आहे. दरम्यान, प्रत्येक गावांमध्ये जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या उमेदवारांच्या प्रचाराला प्रतिसाद मिळत आहे. यावेळी उमेदवारांनी आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी नागरिकांबरोबर संवाद साधून, खटारा चिन्हा समोरील बटन दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी माजी आ. बाळाराम पाटील, पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील, ज्ञानेश्वर बडे, सिताराम पाटील, शांताराम पाटील, मनोहर फडके, कैलास म्हात्रे, जगन्नाथ साडेकर, बाळकृष्ण पाटील, अनिल भोपी, गोविंद पाटील, मधुकर गायकर, नामदेव गाताडे, जीवन पाटील, रुपेश पाटील, भूषण पाटील, संदीप घोगरे, प्रकाश पाटील, दीपक पाटील, जगन पवार, ज्ञानेश्वर पाटील, शांताराम गायकर, आदिनाथ, विशाल पाटील, यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)






## राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक करार लाभदायक ठरतील. अपघात, चोरीबाबत सावध राहावे. प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **वृषभ** : व्यापारवृध्दीसाठी अनुकूलता राहील. जुनी येणी विनासायास वसूल होतील. प्रवासात काळजी घ्या.
- **मिथुन** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. मनाविरूध्द घटना संभवतात. बेरोजगारांना संधी लाभतील.
- **कर्क** : सुखद वार्ता कानी येईल. रखडलेली कामं मनाजोगी होतील. विवाहाच्या प्रयत्नांना चालना मिळेल.
- **सिंह** : अपेक्षित फलप्राप्तीचे योग आहेत. घाईगडबडीने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर सौख्य लाभेल.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा असेल. अचानक धनलाभ संभवतो.
- **तूळ** : तुर्तास व्यवहार टाळावेत. स्थापत्य, अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील. कलागुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : धरसोडीचं धोरण टाळावं. आपलंच खरं हा अट्टाहास ठेवू नये. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.
- **धनु** : कौटुंबिक बाबतीत चिंता राहील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. अपेक्षित भेटीबाबत विचारानं रहावं.
- **मकर** : कारकिर्दीत नव्या संधी लाभतील. वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **कुंभ** : कौटुंबिक वाद वाढवू नयेत. भागीदारी व्यवसायात विचारानं रहावं. महत्त्वाचे करार मनाजोगे होतील.
- **मीन** : स्वमताग्रह टाळायला हवा. खऱ्या हितचिंतकांची योग्य पारख करा. वाढत्या खर्चाला आवर घालावा.

स्टाईल स्टेटमेंट

## ट्राय दिज पर्सेस

✻ लग्नप्रसंगी घातल्या जाणाऱ्या पारंपरिक तसंच इंडो-वेस्टर्न पेहरावासोबत गोल्डन किंवा सिल्व्हर पोटली बॅग घेता येईल. वेडिंग लूक पूर्ण करण्यासाठी एखादी पोटली बॅग नक्की घ्या. पेहरावाला मॅचिंग पोटली बॅगही छान दिसेल. ✻ पाश्चिमात्य आणि भारतीय अशा दोन्ही पेहरावांवर शोभून दिसणारी पर्स म्हणजे क्लच स्टाईल हँडबॅग. कॅरी करायला अत्यंत सुलभ असणारी ही बॅग तुमच्याकडे असायला हवी. ✻ 'मिनी पर्स' हा प्रकारही खूप छान दिसतो. ही पर्स कोणत्याही पेहरावावर खुलून दिसते. मिनी पर्समुळे एका क्षणात 'क्लासी लूक' मिळवता येतो. ✻ लेहंगा, साडी, सलवार कमीज किंवा जीन्स, स्कर्ट कशावरही स्लिंग बॅग कॅरी करता येते. खांद्याला अडकवता येणाऱ्या या बॅगमुळे हात मोकळे राहतात. या बॅग्ज कोणत्याही ऑकेजनला कॅरी करता येतील. ✻ सध्या स्वत:चं नाव लिहिलेल्या क्लचेसचा ट्रेंड आहे. तुम्ही कस्टमाईज्ड क्लचही वापरू शकता. विविध संदेश लिहिलेली क्लचेस ट्राय करता येतील.

## ६ फेब्रुवारी

दिनविशेष

- **१९३९** : बडोद्याचे महाराज सर सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचं निधन.
- **१९४०** : नॉर्वेच्या सागरी हद्दीत आश्रयास असणाऱ्या जर्मन तेलवाहू नौकेवरील ३०० ब्रिटिश खलाशांची एच.एन.एस. कोर्सेक या विनाशिकेने सुटका केली.
- **१९४४** : चित्रपटसृष्टीचे जनक समजले जाणारे धुंडिराज गोविंद उर्फ दादासाहेब फाळके यांचे निधन.
- **२०१४** : सिद्ध समाधी योगवर्गाचे गुरू श्री ऋषी प्रभाकर यांचं निधन.

सफर देशांची

## आफ्रिकेतला झांबिया

आफ्रिका खंडाच्या दक्षिण भागात 'झांबिया' नावाचा देश आहे. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या 'झांबिया'चे 'कांगो', 'टांझानिया', 'मलावी', 'मोझांबिक', 'झिम्बाब्वे', 'बोट्सवाना', 'नामिबिया' आणि 'अंगोला' हे शेजारी देश. 'नॉर्दन ऱ्होडेसिया' हे या देशाचं जुनं नाव. 'झांबेवी' नदीवरून त्याला नवं नाव मिळालं. 'ल्युसाका' ही झांबियाची राजधानी आणि देशातलं सर्वात मोठं शहर. झांबियामध्ये एकेकाळी ब्रिटिशांचं राज्य होतं. १९६५ मध्ये हा देश स्वतंत्र झाला. त्यानंतर १९९१ मध्ये पहिल्यांदा लोकशाही पद्धतीने निवडणुका पार पडल्या. इंग्रजी ही इथली अधिकृत भाषा. यासोबतच इथे इतरही बऱ्याच भाषा बोलल्या जातात. 'झांबियन क्वाचा' हे इथलं चलन. या देशात तांब्यावर आधारित उद्योग मोठ्या प्रमाणावर आहेत. तांब्याच्या खाणींमुळे झांबिया तांबं निर्यात करणारा प्रमुख देश बनला. झांबियामध्ये भरपूर निसर्गसौंदर्य पहायला मिळतं. म्हणूनच पर्यटकांना आकर्षित करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. जगातला सर्वात मोठा 'व्हिक्टोरिया' धबधबा या देशात आहे. झांबिया आणि झिम्बाब्वेच्या सीमेजवळ हा धबधबा पहायला मिळतो.

### पंचांग

**शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ कृ. ५, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : हस्त, योग : धृति,
सूर्योदय ७.१३, सूर्यास्त ६.३२

### फॉरवर्डस

**लाख़ समझाया उन्होंने हमें क़ी ग़ैरों से ना मिला क़र...**

**हँसकर हमनें कहाँ उनसें आप भीं तों पहले ग़ैर हीं थें...!**

आरोग्यमंत्र

## कारले : एक अमृतफळ

कडू कारले, तुपात तळले, साखरेत घोळले, तरी कडू ते कडूच! अशी ओळख असणा-या कारल्याचं नाव ऐकताच जीभेची चव कडवट होते. पण कारल्याच्या कडूपणावर जाऊ नका. कारण कारल्याइतकी बहुगुणी भाजी दुसरी कोणती नसेल. ग्रीष्मात आढळणाऱ्या भाज्यांमध्ये कारले एक आहे. कारल्याची वेल बरीच वर्षे जगणारी असते ती बऱ्याच ठिकाणी आपोआप उगवलेली सुद्धा दिसते. चवीने कडू असलेले कारले हे आरोग्यासाठी अत्यंत हितावह आहे. कारले भारतात सर्वत्र पिकते व अती प्राचीन काळापासून कारल्याचा उपयोग फळभाजी बरोबरच औषधातही केला जातो. संस्कृतमध्ये कंदुरा (करवल्ली), हिंदीमध्ये करेला, इंग्रजीमध्ये कॅरिला फ्रुट किंवा बिटर गोर्ड म्हणून ओळखले जाणारे कारले ही वनस्पती कुकरबिटेसी या कुळातील आहे. कारले हिरवट, पांढरसर, काळसर हिरव्या रंगांची आणि पिकल्यानंतर आतून लाल, केशरी होतात. कारली मोठी आणि लहान अशा दोन प्रकारची असतात तर रंगभेदामुळे कारल्याचे पांढरी, हिरवी असेही दोन प्रकार सबंध भारतात आढळतात. कारले सर्व सामान्य आहारामध्ये वापरले जात असले तरी ते एक उत्तम औषध म्हणून वैद्य पाहतात. हल्ली बाजारात मिळणारी हायब्रीड आणि मोठी कारली शक्यतो आहारात वापरू नयेत.भरपूर रेषा असणारी आणि मध्यम आकाराची कारली वापरावीत.



### फॅशन पॅशन

मुलांच्या ॲक्सेसरीजमधला महत्त्वाचा घटक म्हणजे कफलिंक्स. बाजारात विविध प्रकारचे, रंगाचे कफलिंक्स मिळतात. ही स्टाईल कशी कॅरी करायची याविषयी...

✻ फॉर्मल पार्टी किंवा लग्नाला सूट घालून जायचा विचार असेल तर त्यावर चौकोनी आकाराचे ब्लू डायमंड जडवलेले कफलिंक्स लावा.

✻ नाव किंवा आडनावाच्या पहिल्या अक्षराचे कफलिंक्स तयार करून घेऊ शकता. हा प्रकार खूप हटके दिसतो.

✻ महागड्या डिझायनर सूटवर लंबगोल कफलिंक्सचा पर्याय निवडा. यामुळे तुम्हाला स्टायलिश लूक मिळेल. (क्रमश:)

करिअरवाटा

## सारखी नोकरी बदलताय?

काळ बदलला की कार्यशैली आणि कामाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल घडतो. याच धर्तीवर सध्या एखादी नोकरी मिळाली की ती वर्षाभरातच सोडून दुसरी शोधण्याचा ट्रेंड आहे. याला जॉब हॉपिंग म्हणतात. तंत्रज्ञान सतत बदलत असल्यामुळे एका तंत्रज्ञानाचा कंटाळा आला की दुसऱ्या प्रकारच्या तंत्रज्ञानाशी संबंधित नोकरी करण्याकडे मुलांचा कल आहे. तरुण आहोत तोपर्यंत आणि नव्या नोकरीत स्वीकारले जाऊ शकतो तोपर्यंतच नव्या क्षेत्रात उडी मारावी असा विचार तरूणाई करत आहे. नोकरी करणाऱ्या तरुणांचा याबाबतचा कल जाणून घेतला असता असं दिसून येतं की, ७३ टक्के मुलांना वारंवार नोकरी बदलण्यात काही गैर वाटत नाही. काही मुलांना आहे त्या नोकरीत आपल्या गुणवत्तेला म्हणावी तशी चालना मिळत नाही असं वाटतं. म्हणून ते नोकरी बदलतात. ही बाब आज आक्षेपार्ह समजली जात नसली तरीही त्यात एक धोका आहे. एखादा तरुण एखाद्या कंपनीत कामाला लागतो आणि वर्षा-दोन वर्षात बाहेर पडतो. अशानं तो सखोल ज्ञान प्राप्त करू शकत नाही. म्हणूनच असे लोक कोणत्याही तंत्रज्ञानात निष्णात होऊ शकत नाहीत. हा जॉब हॉपिंगचा दुष्परिणामही लक्षात घेण्यासारखा आहे.



खेचाखेची

## तिखट चटणी

**मुंबईकर:** तुमच्याकडे वडापावमध्ये तिखट चटणी नसते का?

.

.

.

**पुणेकर:** आमच्या जिभेला जन्मत:च लावलेली असते.

वेगळं काही

मुंबई विद्यापीठातल्या प्राध्यापिका वैशाली बमबोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनोखं तंत्रज्ञान विकसित केलं आहे. यामुळे शिजवलेलं अन्न तीन वर्षांपर्यंत टिकवता येईल. विशेष म्हणजे यातली पोषणमूल्यं, जीवनसत्त्वंही टिकवून ठेवता येतील. गेल्या सहा वर्षांपासून वैशाली बमबोलेंचं संशोधन सुरू होतं. 'इलेक्ट्रॉन बीम रेडिएशन' असं या तंत्रज्ञानाचं नाव असून या द्वारे इडली, उपमा, ढोकळ्यासारखे भारतीय पदार्थ कोणत्याही प्रिझर्व्हेटिव्हजशिवाय तीन वर्षं टिकतात. 'इलेक्ट्रॉन बीम रेडिएशन'मुळे अन्नातले बॅक्टेरिया नष्ट होतात. यामुळे अन्न बराच काळ ताजं राहतं. या तंत्रज्ञानामुळे दुर्गम भागात ताज्या अन्नाचा पुरवठा करणं सोपं होणार आहे.

जाणून घ्या

## स्टेटमेंट शोल्डर ड्रेसची चलती

सेलिब्रिटींची फॅशन फॉलो करणं हा फार पूर्वीपासून लोकांचा कल राहिलेला आहे. सध्या ट्रेंड आहे स्टेटमेंट शोल्डर ड्रेसचा. या ट्रेंडविषयी...

✻ कोल्ड शोल्डर टॉप- कोल्ड शोल्डर टॉप ही लोअर बॉडीपेक्षा मान आणि खांदा हायलाईट करणारी स्टाईल आहे. कर्वी आणि बस्टी बॉडीसाठी हा पॅटर्न योग्य आहे.



✻ ऑफ शोल्डर टॉप- थोडीशी बोल्ड तरीही लोकप्रिय अशी ही स्टाईल आहे. शर्ट, टॉप, बिकिनी, ब्रायडल ड्रेस, मॅक्सी या सगळ्या प्रकारांवर अधिराज्य गाजवणारी स्टाईल म्हणजे ऑफ शोल्डर स्टेटमेंट.

✻ असिमेट्रिकल शोल्डर टॉप- शोल्डर आणि बॉटम यांच्यात संतुलन असावं यासाठी असिमेट्रिकल टॉप परिधान करा. तुमचा लूक पूर्ण व्हावा यासाठी मेटॅलिक रिस्ट वॉच, सौम्य रंगाची पर्स निवडा. यामुळे स्टायलिश लूक मिळेल.

✻ वन शोल्डर ड्रेस- पार्टीसाठी स्टेटमेंट शोल्डर ड्रेसची निवड करणार असाल तर वन शोल्डर ड्रेस हा सर्वोत्तम पर्याय आहे. या ड्रेसवर कमीत कमी ज्वेलरीचा वापर करावा.

## सुडोकू ६२


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | २ | | ४ | | ९ | | ६ |
| ९ | | | | | २ | | १ | |
| ४ | ८ | १ | | | ७ | २ | | ३ |
| | | | | | ९ | | ४ | |
| | १ | | ३ | | ६ | | ८ | |
| | ६ | | | ८ | | | | |
| ८ | | ३ | ४ | | | १ | ६ | २ |
| | ४ | | १ | | | | | ७ |
| १ | | ७ | | ९ | | ५ | | ४ |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६१चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १ | २ |
| ६ | ७ | २ | १ | ९ | ५ | ३ | ४ | ८ |
| १ | ९ | ८ | ३ | ४ | २ | ५ | ६ | ७ |
| ८ | ५ | ९ | ७ | ६ | १ | ४ | २ | ३ |
| ४ | २ | ६ | ८ | ५ | ३ | ७ | ९ | १ |
| ७ | १ | ३ | ९ | २ | ४ | ८ | ५ | ६ |
| ९ | ६ | १ | ५ | ३ | ७ | २ | ८ | ४ |
| २ | ८ | ७ | ४ | १ | ९ | ६ | ३ | ५ |
| ३ | ४ | ५ | २ | ८ | ६ | १ | ७ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ६२



**आडवे शब्द :-**
१) वायस, कावकाव करणारा पक्षी
४) मेहेरबानी
७) उपयोग
९) परग्रहावर जाणारे वाहन
१०) सेवा करणारा
१२) गाईचे पिल्लू
१४) कोर्टातील खटला
१५) अरण्यवास
१७) खंदक
१८) बारीकसारीक
२१) विशेष उल्लेखनीय हकिगत
२२) टिंगल, उपहास
२३) किंमत, भाव
२४) गीत, नृत्य, वाद्य या कला
२५) बशीचा जोडीदार
२७) पाणी, आयुष्य
२९) सांप्रत काळ
३२) तफावत, फरक
३४) सुरक्षितपणे
३६) कैफी
३७) दीर्घ श्वास, धमकी
३८) मलई
३९) मुसलमान
४१) रवाळ
४३) मिठी
४४) धोका(हिं.)
४६) बारीक दगड
४७) धैर्य, हिंमत
४९) पशू
५२) नातेवाईक
५५) काळ्या तोंडाचे माकड
५७) हालचाल
५८) कट कारस्थानाची गुप्त जागा
६०) एक प्रश्नार्थक शब्द
६१) चालविणारा
६२) द्रव पदार्थ
६३)नजरेचा तीर

**उभे शब्द :-**
१) पूर्ण बदल
२) अरण्य
३) परमेश्वर
५) अनुमती
६) जाडसर पीठ
७)घोडा
८) खोडण्याचे साधन
१०) कै. रमाबाई रानडेंनी स्थापन केलेली मुलींची शाळा
११) गीत, गाणे
१३) पत्रातील थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
१४) धर्मार्थ देणे
१६) नवऱ्याची दुसरी पत्नी
१७) बक्षीसाचा पेला, तबकडी इ.
१९) जय-पराजय
२०) देवाला वाहण्याची फुलांची माळ
२४) सांजवेळ
२६) पगार घेणारा, चाकरमानी
२८) नवरदेवाची आई
३०) विकत घेतलेला नोकर
३१) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
३२) शेवट, नाश
३३) एक पालेभाजी
३५) घर
३८) दक्षता
४०) भडीमार, वर्षाव
४१) चर्मासन
४२) कोर्टातील खटला
४४)वाळा
४५) गवंडी
४८) भीती
५०) नावात केलेला बदल
५१) मांडणी, सजावट
५३) गावठी, अस्सल, गावात तयार झालेले
५४) ✻✻ ✻✻ मन आपले राष्ट्रगीत
५६) धनी
५८) ✻✻ बत्ता, धान्य कुटण्याचे घरगुती साधन
५९) विशेष

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## नि|व|ड|क

### ईशाने जिंकले दुसरे सुवर्ण



**नवी दिल्ली :** ईशा सिंगने एशियन शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये दुसरे सुवर्णपदक जिंकले आहे. नवी दिल्लीतील डॉ. करणी सिंग शूटिंग रेंजमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये ईशाने २३९.८ गुण मिळवले. तर पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये सम्राट राणाला कांस्यपदक मिळाले.बुधवारी झालेल्या अंतिम फेरीत ईशाने सुरुवातीच्या पाच शॉटनंतर सातव्या स्थानावरून पुनरागमन करत १९व्या शॉटमध्ये निर्णायक आघाडी घेतली. चायनीज तैपेईच्या चेंग येन चिंगला रौप्यपदक आणि यू वी एनला कांस्यपदक मिळाले. पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये भारताच्या सम्राट राणाने २२०.३ गुणांसह कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेत उझबेकिस्तानच्या विलामदिर स्वेश्निकोवने सुवर्ण आणि कझाकस्तानच्या वैलीरी राखीमजानने रौप्यपदक जिंकले.सांघिक स्पर्धेतही भारताने उत्कृष्ट खेळ दाखवला. महिला एअर पिस्तूल संघात ईशा सिंग, मनु भाकर आणि सुरुची सिंग या त्रिकुटाने १७२६ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

### आरसीबीसाठी अब्जाधीशांची चढाओढ

**नवी दिल्ली :** आयपीएलमधील सर्वात लोकप्रिय संघांपैकी एक असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या मालकीसाठी कॉर्पोरेट जगतात मोठी चढाओढ सुरू झाली आहे. या संघाची मूळ मालक असलेली डियाजिओ कंपनी आपला हिस्सा विकण्याच्या तयारीत असून, खरेदीदारांच्या शर्यतीत सीरम इन्स्टिट्यूटचे अदार पूनावाला आणि मनिपाल समूहाचे डॉ. रंजन पै यांसारखी दिग्गज नावे आघाडीवर आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरसीबीच्या विक्रीसाठी डियाजिओने २ अब्ज डॉलर इतके मूल्यांकन अपेक्षित धरले आहे. मात्र, संभाव्य खरेदीदार सध्या १.५ ते १.७ अब्ज डॉलर्सच्या दरम्यान बोली लावत आहेत. २ फेब्रुवारीपर्यंत बंधनकारक नसलेली बोली सादर करण्याची मुदत संपली असून, आता पुढील आठवड्यात बोली लावणाऱ्यांची शॉर्टलिस्ट तयार केली जाणार आहे. मनिपाल समूहाचे चेअरमन डॉ. पै हे अमेरिकन खाजगी इक्विटी दिग्गज केकेआर आणि टेमसेक यांच्यासोबत युती करून बोली लावण्याच्या विचारात आहेत. सीरम इन्स्टिट्यूटच्या पूनावाला यांना टीपीजी कॅपिटल या जागतिक गुंतवणूक संस्थेचे समर्थन असल्याची चर्चा आहे.

## टी-२० विश्वचषक स्पर्धा

# चॅम्पियन टीम होणार मालामाल!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

क्रिकेट चाहत्यांची प्रतीक्षा आता संपणार आहे. ७ फेब्रुवारी २०२६ पासून क्रिकेटमधील सर्वात मोठा महासंग्राम म्हणजेच टी-२० विश्वचषक २०२६ ला सुरुवात होत आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या या स्पर्धेत २० संघ मैदानात उतरणार आहे. या स्पर्धेत विजेत्या संघावर पैशांचा अक्षरशः पाऊस पडणार असून, उपविजेत्या संघाचीही चांदी होणार आहे.

आयसीसीने अद्याप अधिकृत घोषणा केली नसली तरी, विविध अहवालांनुसार यंदाची एकूण बक्षीस रक्कम १३.५ दशलक्ष असण्याचा अंदाज आहे. २०२४ च्या विश्वचषकाच्या तुलनेत यंदा बक्षीस रकमेत २०% वाढ करण्यात आली आहे. ही रक्कम केवळ अंतिम फेरीतील संघांनाच नाही, तर सहभागी होणाऱ्या सर्व २० संघांना त्यांच्या कामगिरीनुसार वाटली जाणार आहे.

### भारत आणि श्रीलंकेत रंगणार थरार

**२०२६ चा टी-२० विश्वचषक अधिक भव्य करण्यासाठी आयसीसीने विशेष प्रयत्न केले आहेत. ७ फेब्रुवारीपासून सुरू होणारी ही स्पर्धा ८ मार्च २०२६ रोजी अंतिम सामन्याने संपेल. पूर्ण स्पर्धेत एकूण ५५ सामने खेळले जातील. विशेष म्हणजे, भारतीय संघ या स्पर्धेत 'गतविजेता' म्हणून मैदानात उतरणार असल्याने जगभरातील चाहत्यांच्या नजरा टीम इंडियाच्या कामगिरीवर खिळल्या आहेत.**

- **स्पर्धेमध्ये जगभरातील २० संघाचा सहभाग**
- **भारत आणि श्रीलंकेत रंगणार स्पर्धेचा थरार**



२० संघ सहभागी होत असल्याने अफगाणिस्तान, अमेरिका आणि आयर्लंड सारखे संघ मोठ्या देशांना धक्का देण्यासाठी सज्ज आहेत. मैदानातील ट्रॉफीच्या लढाईसोबतच या छप्परफाड बक्षीस रकमेमुळे खेळाडूंमध्येही मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

### बक्षीस रकमेचे अंदाजित स्वरूप (भारतीय रुपयांत)

**कामगिरीनुसार पुरस्काराची अशी असणार रक्कम (भारतीय रुपये)**
**विजेता संघ सुमारे २७.४८ कोटी रुपये**
**उपविजेता संघ सुमारे १४.६५ कोटी रुपये**
**उपांत्य फेरीतील पराभूत संघ (प्रत्येक संघाला) सुमारे ७.२४ कोटी रुपये**
**५ व्या स्थानावरील संघ (प्रत्येक संघाला) सुमारे ३.४८ कोटी रुपये**
**१३ व्या स्थानावरील संघ (प्रत्येक संघाला) सुमारे २.२९ कोटी रुपये**

## श्री बापूजी बल्लाळेश्वर पाली आगरआळी संघ तृतीय



**| पाली | प्रतिनिधी |**

सालाबादप्रमाणे याहीवर्षी सन्मान फाउंडेशनचे अध्यक्ष रमेश रघुनाथ सागळे यांनी सुधागड तालुकास्तरीय आमदार सन्मान चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन कॉम्रेड गोदूताई परुळेकर मैदान चंदनवाडी ठाणे येथे केले होते.

या स्पर्धेत श्री बापुजी बल्लाळेश्वर पाली आगरआळी संघाने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावीत रोख रक्कम १० हजार सह आकर्षक चषक मिळविला.

सुधागड तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री बापुजी बल्लाळेश्वर पाली आगरआळी संघाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक व रोख रक्कम देण्यात आले.

यावेळी श्री बापुजी बल्लाळेश्वर पाली आगरआळी संघातून कर्णधार आदित्य काटकर, अजिंक्य ठोंबरे, जय पाटील, ऋषा ठोंबरे, राजेश भस्मा, हर्ष काटकर, अजिंक्य काटकर, सौरभ जोशी, नीरज साजेकर, यश भगत यांनी उत्कृष्ट खेळी करत संघाला विजयी केले. विजयी झालेल्या संघांना आणि उत्कृष्ट खेळाडूंना पाहुण्यांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गोरविण्यात आले.

## छत्रपती शिवाजी महाराज चषक प्रमोद इलेव्हनने पटकावला

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरान मैत्री प्रतिष्ठान आयाजित छत्रपती शिवाजी महाराज चषक क्रिकेट स्पर्धेत प्रमोद ११ बंड्या बॉईज क्रिकेट संघ अंतिम विजेता संघ ठरला आहे.

तीन दिवस सुरू असलेल्या स्पर्धेचा अंतिम सामना प्रमोद ११ बंड्या बॉईज क्रिकेट संघ विरुद्ध गोल्डन स्टार क्रि०केट संघ यांच्या मध्ये रंगला होता. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा हुतात्मा वीर भाई कोतवाल क्रीडा संकुलामध्ये संपन्न झाला.



पारितोषिक वितरण सोहळ्यात मैत्री प्रतिष्ठान तर्फे माथेरानमधील नवनिर्वाचित नगराध्यक्ष तथा नगरसेवकांचा सत्कार देखील करण्यात आला.

## पाकिस्तानला दणका!

**दुबई :** भारताविरुद्धच्या टी-२० विश्वचषक सामन्यावर बहिष्कार टाकणे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला महागात पडण्याची शयता आहे. पाकिस्तानने हा सामना न खेळल्यास अधिकृत प्रसारणकर्ते जिओ-स्टार त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करू शकते, असा इशारा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने दिला आहे. पाकिस्तान सरकारने दिलेल्या निर्देशांनुसार पीसीबीने या हाय-व्होल्टेज सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला.

# सूर्यासेनेचा दणदणीत विजय

### दक्षिण आफ्रिकेचा ३० धावांनी केला पराभव

**| मुंबई | प्रतिनिधी |**

टीम इंडियाने सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेतील सराव सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर २४१ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र दक्षिण आफ्रिकेला विजयी धावांचा पाठलाग करताना ७ विकेट्स गमावून २१० धावाच करता आल्या.


भारतासाठी एकूण ८ जणांनी बॅटिंग केली. इशान किशन याने ५३ धावा केल्या. तर अभिषेक शर्मा याने २४ धावांचं योगदान दिलं. इशान आणि अभिषेक दोघेही रिटायर्ड हर्ट होऊन बाहेर गेले. त्यानंतर तिलक वर्मा याने ४५ धावा जोडल्या. कॅप्टन सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या या दोघांनी प्रत्येकी ३०-३० धावा केल्या. रिंकी सिंह याने १६ धावा जोडल्या. तर अक्षर पटेल ३५ धावा करुन नाबाद परतला. तर दक्षिण आफ्रिकेसाठी ४ गोलंदाजांनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली.

दक्षिण आफ्रिकेकडून या डोंगराएवढ्या धावांच पाठलाग करताना फक्त ५ जणांनाच २० पार पोहचता आलं. जॉर्ज लिंडे भोपळा फोडण्यात अपयशी ठरला. डेवाल्ड ब्रेव्हीस याने २ धावा केल्या. कॅप्टन आणि ओपनर एडन मार्करम याने ३८ धावांचं योगदान दिलं. विकेटकीपर रायन रिकेल्टन याने ४४ धावा केल्या. डेव्हीड मिलर याला १३ धावाच करता आल्या.


जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुका - २०२६

मतदार बंधू- भगिनींनो,
आपलं
एक मत जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट)
आणि
एक मत पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (गण)
अवश्य द्या!

मतदान यंत्रावरील (बीयू) मतपत्रिकांचे रंग



जि. प. गटाची मतपत्रिका असेल पांढऱ्या रंगाची
पं. स. गणाची मतपत्रिका असेल गुलाबी रंगाची

(उमेदवारांची संख्या जास्त असल्यास आवश्यकते नुसार एकपेक्षा अधिक मतदान यंत्रांचा (बीयू) वापर करण्यात येतो)

मतदान दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वेळ - सकाळी ७:३० ते सायं. ५. ३०

मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल ॲप आणि https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळाची सुविधा

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र
MaharashtraSEC
कर मतदान... सांगतंय संविधान!


**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)